दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम



## बेकायदेशीर भारतीय स्थलांतरितांचा गंभीर पेच!

संपादकीय

भारतीय नागरिकांचे परदेशात जाणे आणि स्थायिक होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः, अमेरिकेतील चांगल्या रोजगाराच्या संधी आणि उत्तम जीवनशैलीच्या आकर्षणामुळे अनेक भारतीय तिथे जाण्यास इच्छुक असतात. मात्र, सर्व भारतीय कायदेशीर मार्गाने अमेरिकेत जात नाहीत. काही जण एजंटांच्या मदतीने, खोट्या कागदपत्रांच्या आधारावर किंवा थेट मेक्सिकोच्या सीमेवरून बेकायदेशीरपणे अमेरिकेत प्रवेश करतात.



अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कठोर स्थलांतर धोरणांमुळे अशा बेकायदेशीर स्थलांतरितांसाठी परिस्थिती अधिक कठीण झाली. ट्रम्प प्रशासनाने लष्करी यंत्रणेचा वापर करून मोठ्या प्रमाणावर स्थलांतरितांना परत पाठवण्याचा निर्णय घेतला. या कारवाईत अनेक भारतीय बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतात परतवण्यात आले. या घटनेमुळे भारतातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

**बेकायदेशीर स्थलांतरित – समस्या आणि वास्तव**

भारतातून अमेरिकेत जाण्यासाठी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करणाऱ्या लोकांची संख्या लक्षणीय आहे. यामागील प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

1. **अमेरिकेतील आर्थिक संधी:** भारतातील बेरोजगारी आणि कमी वेतन यामुळे अनेक तरुण अमेरिकेत स्थायिक होण्याचा प्रयत्न करतात.
2. **एजंट आणि दलालांची फसवणूक:** अनेक एजंट युवकांना गोडगोड आश्वासने देऊन त्यांना बेकायदेशीर मार्गाने अमेरिकेत पाठवतात.
3. **कौटुंबिक स्वप्ने आणि दबाव**: काही जण आपल्या कुटुंबासाठी अधिक चांगले आयुष्य मिळवण्यासाठी कोणत्याही मार्गाने अमेरिकेत जाण्यास तयार होतात.
4. **हिंदुस्थानी समाजातील प्रतिष्ठा**: परदेशात जाऊन पैसा कमावणे हे प्रतिष्ठेचे लक्षण समजले जाते, त्यामुळे अनेकजण मोठ्या जोखमी पत्करतात.

अशा पद्धतीने अमेरिकेत पोहोचलेल्या भारतीय नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांना कायमस्वरूपी काम मिळत नाही, सुरक्षितता नसते आणि अमेरिकेतील कायद्यांचे उल्लंघन केल्यामुळे कोणत्याही क्षणी त्यांना अटक होण्याची भीती असते.

**ट्रम्प प्रशासन आणि लष्करी कारवाई**

डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१७ मध्ये अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर त्यांनी स्थलांतर धोरण अधिक कठोर केले. त्यांचे म्हणणे होते की, "अमेरिकेत केवळ कायदेशीर नागरिकांनी राहायला हवे. बेकायदेशीर स्थलांतरित हे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर आणि सुरक्षा व्यवस्थेवर मोठा भार आहेत."

त्यामुळे त्यांनी अमेरिकेतील **"Immigration and Customs Enforcement (ICE)"** या संस्थेला बेकायदेशीर स्थलांतरितांविरोधात कठोर पावले उचलण्याचे आदेश दिले.

**लष्करी योजना आणि बेकायदेशीर स्थलांतरितांची हकालपट्टी**

ट्रम्प प्रशासनाने स्थलांतर धोरण लागू करताना काही महत्त्वपूर्ण पावले उचलली:

1. **सीमेवरील सुरक्षा वाढवली** – मेक्सिको सीमेवर अमेरिकन सैन्य तैनात करून स्थलांतरितांना रोखण्यात आले.
2. **अटक आणि तुरुंगवास** – बेकायदेशीर स्थलांतरितांना पकडून तात्काळ बंदी केंद्रात पाठवण्यात आले.
3. **जलद प्रत्यर्पण प्रक्रिया** – कोणत्याही कायदेशीर सुनावणीशिवाय त्यांना तातडीने त्यांच्या मूळ देशात पाठवण्यात आले.

**भारतीय नागरिकांवर विशेष लक्ष** – अमेरिकेत मोठ्या प्रमाणात असलेल्या भारतीय स्थलांतरितांवर देखील कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमधील लोक होते, विशेषतः पंजाब, गुजरात, तेलंगणा आणि केरळ येथील अनेक नागरिकांना भारतात परत पाठवण्यात आले. अमेरिकेतील भारतीय नागरिकांना परत पाठवण्याच्या मुद्द्यावर भारतातील अनेक राजकीय पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा सरकारने ट्रम्प प्रशासनाकडे भारतीय नागरिकांना "मानवी सन्मानाने" परत पाठवण्याची विनंती केली. अमेरिकेतील भारतीय राजदूतांनी ट्रम्प प्रशासनाशी संवाद साधून कायदेशीर पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला.
काँग्रेसने ट्रम्प यांच्यावर टीका करत म्हटले की, "भारतीय नागरिकांना अपराधी ठरवण्याऐवजी त्यांच्या पुनर्वसनासाठी उपाययोजना करायला हव्यात."इतर पक्षांनीही ट्रम्प प्रशासनाच्या कठोर भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तथापि, वास्तविकता अशी आहे की हे नागरिक आधीच अमेरिकेचे कायदे तोडून गेले होते, त्यामुळे त्यांना बेकायदेशीर ठरवणे चुकीचे नाही.
भारतात परतलेल्या नागरिकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी राज्य सरकारे आणि केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा.तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी कठोर नियम आणि शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. भारतीय युवकांनी बेकायदेशीर मार्ग सोडून कायदेशीर प्रक्रियेद्वारे परदेशात जाण्यासाठी प्रयत्न करावा, जेणेकरून त्यांच्या भविष्याला धोका निर्माण होणार नाही.

**'वाडा'** या पुस्तकाचे प्रथितयश लेखक **श्री. विलास कोळी** आजपासून **'गड किल्ल्यांचे स्थापत्य शास्त्र'** या सदरातून गड - किल्ल्यांचे बांधकाम याबद्दल अतिशय माहितीपूर्ण आणि अभ्यासू विवेचन देणार आहेत आजपासून हे नवीन सदर दर रविवारी आपल्या भेटीस येणार आहे.

# चंद्रावरची गाय


## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर, त्रिंबक,
ता.मालवण. मो.
९४२१७९५९५५.

माझ्या बालपणी माझा बाबा फावल्या वेळेत मला खूप गोष्टी सांगायचा. अर्थात त्याचा फावला वेळ हा सायंकाळपासून ते रात्री पंगत बसेपर्यंतचा असायचा. दरवर्षी देवदिवाळीत घरासमोरचे खळे बाबा कुदळीने खणून परत नव्याने करायचा. यासाठी तो आमच्यासकट घरातल्या सगळ्यांनाच कामाला लावायचा. भल्या पहाटे आम्ही भावंडे, बाबा खळे खणावयास सुरुवात करायचो. खणून झाल्यावरच खरी धावपळ सुरु व्हायची. आई, बायो वगैरे चार पाच जणींनी महापुरुषाजवळच्या तळ्यातून दुडींनी भरभर पाणी आणायचे आणि बाबाने खोऱ्याने माती भिजवीत खळे करायचे असा हा दरवर्षीचा ठरलेला कार्यक्रम असायचा. एकदा खळे करून झाले की त्याला जपावे लागायचे. नुकत्याच केलेल्या खळ्यावरून कोंबड्या, पिल्ले, कुत्रे चालत गेले की त्यांच्या पायांच्या नक्षी ओल्या जमिनीत उमटायच्या. त्या नक्षी, ते आकार अगदी सुरेख दिसायचे. एखादा चित्रकारदेखील इतक्या सहजपणे रेखाटू शकणार नाही इतके सुबक ते दिसायचे. मात्र बाबाला अशा वेळेस कोंबड्यांचा भयंकर राग यायचा. खळ्याकडे धावणाऱ्या कोंबड्यांना तो 'सकेरे' मारून लांब पिटाळायचा. पुढचे तीन चार दिवस तो एकटाच खळ्याची जमीन चोपटण्याने धोपटायचा. अशी दोन तीन चोपणी बाबाने दरवर्षीच्या खळ्यासाठी विष्ण्या सुताराकडून बनवून घेतली होती.

दर आठवड्यास खळे शेणाने सारविताना आईची कंबर मोडून यायची. दोन. तीन दिवसांचे शेण साठवा, खळ्यात ओता, मग परत तळ्यावरून दुडींनी पाणी आणून खळे सारवा, पुर्वीची माणसे किती कामे करायची नाही? एकदा खळे वावरण्यासाठी तयार झाले की मग आमची संध्याकाळ, संध्याकाळचा अभ्यास, कधी कधी रात्रीचे जेवण खळ्यावरच असायचे. मे महिन्यात मुंबईकर चाकरमानी आले की सगळ्या बापयांना, मुलांना रात्री खळ्यातच झोपावे लागायचे. दररोज संध्याकाळी दिवाबत्ती झाल्यावर बाबा खळ्यात चटई टाकून आम्हाला अभ्यासाला बसवायचा. आमचे वाचन, शुद्धलेखन,





पाढे पाठांतर दररोज घ्यायचा. बाबाला तर पावकी, निमकी, पाऊणकी, अडीचकी वगैरेसारखे पाढेदेखील तोंडपाठ होते. आम्हाला ते पाढे अभ्यासात नसले तरी तो गमतीने म्हणून दाखवायचा. ते पाढे ऐकायला छान, लयबद्ध वाटायचे. कधी कधी बाबा त्याने त्याच्या बालपणी गिरवलेले मोडी लिपीचे कित्ते बाहेर काढायचा. शाईत टाक बुडवून गिरवून दाखवायचा. मोडी लीपी, अक्षरांची वळणे किती लयबद्ध व सुंदर दिसतात!

दररोज खळ्यात बसून अभ्यास करता करता आमचे आपसूकच 'आकाश दर्शन ' घडायचे. अभ्यास लवकर आटोपून मी दररोज रात्री चांदण्यांनी भरलेले आकाश एकटक बघत बसायचो. आकाशात मध्येच अचानक तुटून पडणारे तारे, विमानासारखे एका रेषेत चालणारे तारे, लुकलुकत चालणारी विमाने दररोज बघितली तरी कंटाळा यायचा नाही. आकाशातील शुक्राची चांदणी, सप्तर्षी, व्याध वगैरे दाखवताना बाबा त्यांची माहिती सांगायचा. बाबा तसा फक्त पाच बुके शिकलेला, आयुष्यभर शेतात राबणारा माणूस. पण त्याला रात्रीच्या आकाशाची बऱ्यापैकी माहिती होती. चंद्राच्या दररोजच्या कला, पौर्णिमा, अमावास्या वगैरेंची त्याला चांगली माहिती होती. आकाशात आपल्या सूर्यासारखे आणखी असंख्य सूर्य आहेत हे पहिल्यांदा त्यानेच आम्हाला सांगितले होते. आपल्या पृथ्वीला जर चंद्रासारखा उपग्रह नसता तर आपली रात्र किती कंटाळवाणी नि भयंकर वाटली असती नाही? पौर्णिमेचा चंद्र दाखवून बाबा आम्हाला अनेक चिकित्सक प्रश्न विचारायचा. चंद्राकडे पाहिल्यावर काय काय दिसते? वगैरे सारखे प्रश्न विचारल्यावर आमची उत्तरे निरनिराळी असत. मग बाबा सांगायचा, चंद्राकडे नीट निरखून बघा. चंद्रावर मोठ्ठे वडाचे झाड दिसते आहे. त्या झाडाकडे बघा. त्या झाडाला कोणता प्राणी बांधून ठेवलाय बरे? वडाच्या झाडाला गाय बांधून ठेवलीय, आणि त्या गायीशेजारी खडकावर बसलेले दिसताहेत ते तुमचे देवाघरी गेलेले आजोबा. देवाने त्यांना तिथे चंद्रावरच्या कुरणावर गायी राखायचं काम दिलंय. इकडे असतानाही ते दररोज गुरे संभाळायचे. बाबाने सांगितलेली माहिती मला अनेकदा अचंबीत करणारी असायची. अनेकदा शाळेत गुरुजींनी चंद्राबद्दलची सांगितलेली माहिती आणि बाबाने सांगितलेली माहिती याचा मेळ बसायचा नाही. चंद्रावर माणसेच नाहीत, झाडे, नद्या वगैरे जीवसृष्टीच नाही तर तिथे गायी कशा बरे राहत असतील? त्या काय खात असतील, पाणी कुठे पीत असतील, त्यांचे गोठे कुठे असतील, त्या नील आर्मस्ट्राँगला एखादी गाय कशी बरे दिसली नाही वगैरे वगैरे प्रश्न डोक्यात गुंतागुंत करायचे. बरे, बाबालाच उलट हे प्रश्न विचारावेत असे कधी वाटायचे. पण मग बाबा चिडेल, रागावेल, दांडकून काढेल अशी भीतीही वाटायची.

आताची मुले आमच्यासारखी रात्रीचे आकाश दर्शन करीत नाहीत. गावातील प्रत्येक घरासमोरील पक्क्या खळ्यांवर आता पक्क्या सिमेंटचे पत्रे बसले आहेत. शिवाय आताची मुले संध्याकाळी घरात शिरल्यावर रात्री बाहेर पडत असतील अशी शक्यता नाही. शहरांतल्या रात्रीच्या आकाशाची तर गंभीर परिस्थिती आहे. तिथल्या आकाशात रात्री चंद्र दिसला तरी खूप झाले! बाकी चांदण्या वगैरे दिसणे म्हणजे दुर्मिळ योग. आमचे एक बरे झाले, आजवरचे आयुष्य गावात गेलेय. त्यामुळे माझ्या मुलांना स्वारस्य नसले तरी मी एखाद्या चांदण्या रात्री, कधी अंधाऱ्या रात्री घराबाहेर बसून आकाश दर्शन करतो. आजच्या विज्ञानयुगात वावरताना चंद्राबद्दलची बरीचशी माहिती गाठीला आहे. तरीही पौर्णिमेच्या रात्री चंद्राकडे पाहिल्यावर नकळत चंद्रावर मोठ्ठे वडाचे झाड, वडाच्या झाडाला बांधलेली गाय, गायीच्या शेजारी खडकावर बसलेले आजोबा दिसतात. हे असे का बरे वाटत असावे?

# प्रतिक्रिया

**आद.राष्ट्रपाल सावंत सर**
**सविनय जयभीम!**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार** वर्तमान पत्रात ,**आठवणीतील व्यक्तिमत्वे** या सदरात माझ्या विषयी लेख लिहुन प्रसिद्धि केला. या खेड्यातील अडगळीत पडलेल्या छोटया कलावंत पामरास उजेडात आणल्याबद्दल आभार कसे आणि कुठल्या शब्दाने मानावेत ? आता मात्र मनाचा गोंधळ उडाला असून काहीच सुचेनासे झाले आहे. माझ्या विषयी वास्तववादी दृष्टिकोन,सावंत सरांचा नक्कीच आहे. म्हणुनच त्यांची विनम्रतापुर्वक लेखणी,अनेक छोटया मोठय़ा कलाकारांसाठी पुढे सरसावलेली दिसते. हे असले कार्य सतत सुरूच आहे. सरांचा निस्वार्थी छंद माझ्याबरोबर इतरांना ही सुखद आनंद देणारा तर आहेच ,परंतु म्हाताऱ्या कलाकाराला मुठभर मांस आणि भरपुर ऊर्जा प्राप्त करून देणारी सरांच्या लेखणीची अदभूत किमया वाटावी .
आद. राष्ट्रपाल सावंत सरांचे अंत:करणपुर्वक हार्दिक अभिनंदन करतो. या आंबेडकरी चळवळीतील कलाकारांसाठी त्यांना उदंड निरोगी आयुष्य लाभो .अशी मंगलमय मनोकामना!

**जनीकुमार कांबळे**
**फोंडाघाट ,तालुका - कणकवली, जिल्हा - सिंधुदूर्ग**



# निमाताईची पाथर

## गावाकडच्याआठवणी



भाग- ८

भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१

एका लहानशा वाडीत तिचा सामान्य कुटुंबात जन्म झाला. तीस पस्तीस घरांची ही वाडी. जिथे माणसे साधी, सरळ आणि भोळी होती. अशा माणसात एक भोळी मुलगी होती तिचे नाव निमाताई. न वेडी, न शहाणी. ती फक्त तिच्यासारखी होती—अलिप्त, निष्पाप, आणि नेहमी हसणारी. वाडीत निमाताईबद्दल मोठं प्रेम आणि आदर होतं. ती अत्यंत साधी होती, प्रेमळ होती. सर्वांसारखे तिचे जगणे नव्हते. लहानपणापासूनच ती अल्लड आणि उनाड होती. गावच्या प्रत्येक घराशी तिचं काही ना काही नातं होतं. पण तिची एक खास जागा होती ती म्हणजे तिची पाथर. सकाळी इथून गाव पाहणं, दुपारी इथे बसून एखाद्या मुली सोबत गप्पा, गोष्टी सांगणं, संध्याकाळी गप्पा मारणं—निमा ताईसाठी ही पाथर तिच्या आयुष्याचा एक भाग बनला होता. गावातली सगळी मुलं वाढली, मोठी झाली, संसारात गुंतली. पण निमा ताई मात्र तशीच राहिली—न लहान, न मोठी. तिची गणती कुणी वेड्यांत करत नव्हतं, पण शहाण्या जगातली ती नव्हती. लोकांनी विचारलं, "तिला काही कळतं का?" आणि मग तितक्याच संभ्रमात राहिले. कारण कधी कधी तिची वाक्यं तल्लख असायची, तर कधी अगदी निरागस. वाडीच्या मध्यभागी ती पाथर अजूनही आहे. जरा झिजलेली, गावकऱ्यांच्या आठवणींनी भारलेली. निमा ताईची पाथर.

कुणालाही पाहताच खुदकन हसायची. थोडे विचित्र हावभाव करायची. काहीतरी प्रश्न करायची. पण हे वेड्यासारखे कुणालाच कधी वाटले नाही. उलट प्रत्येक माणसाला तिच्या बद्दल सहानभुती, दया वाटायची. आपुलकीने एखादा बिस्कीटपुडा किंवा पाच दहाची नोट हातावर टेकवत. तितक्याच निरागसपणे ती स्वीकारत होती. कधी त्याच पाथरीवर बसून ती जेवत असे. काहीना काही खात असे. विस्कटलेल्या केसांत कधी फणी फिरवत असे. लाल रीबनिने केसांच्या दोन वेण्या घातलेल्या नेहमी दिसायच्या.तर कधी सुटलेल्या वेण्या. दोन्ही हातात भरगच्च बांगड्या भरलेल्या असायच्या. गळ्यात मण्यांच्या चार पाच बोरमाळा, गंडे दोरे घातलेल्या असत. हातात वाटी किंवा जर्मनचे ताट असायचे. मळकट ड्रेसवर ती तासनतास त्या पाथरीवर बसून असायची. कधी तिचे डोळे चमकत तर कधी नाकातील पुळी चमकत असे.तिच्यात नैसर्गिक व्यंग होते पण कधीच कुणी निमाताईची व्यंग्यता दाखवली नाही. साऱ्या गावासाठी ती आपुलकीचा आणि मायेची भावनाहोती. आता ती नाही, पण तिच्या आठवणी मात्र या पाथरीवर कोरल्या गेल्या आहेत. कोणीही दु:खी असलं, की सहजच त्या पाथरीवर येऊन थोडा वेळ बसतो. जणू काही निमा ताई अजूनही तिथेच आहे, त्यांच्या व्यथा ऐकते आहे असे वाटते. तर दिवेलागणीला तिथे बायामाणसे बसून आपल्या कथा, व्यथा मांडत बसतात. निमा ताई गेल्यापासून ही पाथर काहींसाठी श्रद्धेचं ठिकाण झालय. काहीजण तिथे दिवा लावतात, काही जण निमा ताईच्या नावाची पाथर आहे असे सांगतात. काही फक्त शांत बसून तिच्या आठवणींमध्ये रमून जातात.

निमा ताई साधी, निरागस, आणि कायम आनंदी असायची. ती या पाथरावर बसून नुसती हसायची. कधी कुणाची गमतीशीर आठवण सांगून, कधी गावातल्या पोरांच्या खोड्यांवर खुदुखुदु हसत, तर कधी आपल्याच विचारांत रमून मनमोकळं हसत बसायची तिच्या त्या हास्यात एक वेगळीच जादू होती—दु:ख विसरायला लावणारी, काळजाला स्पर्श करणारी. ती पाथरीवर बसली की हसायची—कधी उगीच, कधी कोणाच्या बोलण्यावर, कधी स्वत:वर. कोणी हाक मारली तर एकदम चटकन वळून पाहायची, पण उत्तर द्यायचं की नाही, हे तिच्या मनावर असायचं. कधी गावातल्या पोरींना तिचा हेवा वाटायचा—"बघ ना, ना तिला लग्नाची चिंता, ना संसाराचं ओझं." पण कधी कधी ती एका कोपऱ्यात शांत बसलेली दिसायची, जणू तिचं मन काही शोधत होतं असे वाटायचे.

संध्याकाळी शेजारची माणसं तिच्या भोवती बसायची. कोणाचं लग्न ठरलंय, कुणाची शेती कशी चाललीय, कुणाच्या घरात नवीन पाहुणा आलाय—या सगळ्या गोष्टी निमा ताईच्या कानावर पडायच्या. आणि ती मोठ्यानं हसायची,तिच्या प्रत्येक बोलण्यात मायेची ओल असायची.लोक तिला त्रास देत नव्हते, पण फारसं गांभीर्यानं घेत नव्हते. तिच्या जगण्याला ना कसली चौकट होती, ना कुठलाही नियम. कोणाचं दु:ख ऐकायचं, कोणाच्या गमतीवर हसायचं, कोणत्या गोष्टीकडे दुर्लक्ष करायचं—हे तिला कुठेतरी नकळत समजत होतं.आता ती नसली तरी तिचं अस्तित्व आहे. तिच्या मायेचा गारवा अजूनही या पाथरीवर जाणवतो. तिच्या मुळे हा दगड फक्त एक नैसर्गिक पाषाण राहिला नाही, तर तो गावाच्या इतिहासाचा आणि आठवणींचा अढळ आधार बनला. निमा ताईची पाथर ही आता फक्त जागा नाही, तर एक भावना आहे—प्रेमाची आणि आठवणींची.

गावातल्या वृद्ध माणसांचं म्हणणं आहे, "ही पाथर अजूनही उष्ण आहे, जणू निमा ताईचं हसू अजूनही त्यावर थांबलंय." ती नसली तरी तिच्या आठवणी त्या पाथरीवर कोरल्या गेल्यात—हसऱ्या, मनमोकळ्या आणि प्रेमळ.तिच्या पाथरीवर बसलं की असं वाटतं, जणू अजूनही तिथे कुणीतरी निश्चिंत हसतंय, फिकट, निरागस, आणि अर्धवट-पूर्ण अशा जगाच्या सीमारेषेवर राहणारं. निमा ताई शहाणी नव्हती, वेडी नव्हती—ती फक्त तिच्यासारखी होती. आणि त्यामुळेच अजूनही तिला कुणी विसरला नाही.वाडी अजूनही त्या पाथराभोवती फिरतंय. कोणी तिथे बसलं, की असं वाटतं, जणू ती अजूनही तिथेच आहे. एखाद्या झुळुकीत तिच्या हास्याचा प्रतिध्वनी ऐकू यावा, असं प्रत्येक गावकऱ्याला वाटतं. पाथर फक्त दगड नव्हता, तर तो निमा ताईच्या हास्याचा मैलाचा दगड आणि प्रवासाचा साक्षीदार होता.

---

# कलाविश्व

श्री. श्रीराम शेटये

## मूर्तिमंत अभिनयाची मानबिंदू -रीना रॉय



एक दुजे के लिए' या चित्रपटातील तिची भुमिका अजरामर ठरली. कमल हासन सोबतचा तिचा अभिनय अप्रतिम होता.अगदि पराकोटीची प्रेमकहाणी आणि तितकाच पराकोटीचा विरह या दोन्ही भुमिकात तीने अक्षरक्षः जीव ओतला . वासू आणि सपना यांची ही प्रेमकाहाणी घराघरात पोहचली. आपल्या पात्राशी भुमिकेशी एकरूप होणारी अभिनेत्री म्हणजे रीना रॉय.

' एक दुजे के लिए' मधली सपना पाहून अनेक तरूणींनी स्वत: मध्ये सपना शोधण्याचा प्रयत्न केला. ऐंशी च्या दशकातला तो काळ प्रत्येक तरूणीला प्रेमात पडताना आपण सपना आहोत असेच मनोमन वाटे. हा चित्रपट पाहिल्यावर त्या काळात अनेक तरूण तरूणीनी आत्महत्या केली होती. ईतकी की शासनाकडून या चित्रपटावर बंदी घालण्यात आली होती.

अर्थात चित्रपटाचे दिग्दर्शन, संगीत, लता मंगेशकर आणि एस पी बालसुब्रमन्यम यांची गाणी या सगळ्यांचा सुरेल संगम या चित्रपटात होताच. परंतू कमल हासन आणि रती अग्नीहोत्री यांच्या एकजीनसी एकरूप जिवंत अभिनयाने जी वास्तववादी उंची गाठली ती एकमेवाद्धितीय होती.

जसा 'शोले' चित्रपट परत बनू शकत नाही तसेच 'एक दुजे के लिए ' सुद्धा दुसरा होने नाही. संपुर्ण चित्रपटात वासू आणि सपना हे अभिनय करीत आहेत असे कुठेही जानवत नाही. वासू आणि सपना ही खरोखरच आपल्यासमोर वास्तवात आहेत असे संपूर्ण चित्रपट पाहाताना आणि चित्रपट संपल्यावरही वाटत रहाते. ईतका जिवंत अभिनय रती अग्नीहोत्री आणि कमल हासन यांनी केला आहे.

७ जानेवारी १९५७ मुंबई येथे जन्मलेल्या रीना रॉय यांचे खरे नाव रुपा सिंह. रीना यांचे वडील मुस्लिम तर आई हिंदू होती. रीना रॉय यांच्या आईवडिलांचे लग्न फार काळ टिकले नाही, चौथ्या अपत्याच्या जन्मानंतर त्यांचा घटस्फोट झाला. त्यानंतर ते रीनाची आई आणि आपली चारी अपत्ये सोडून चेन्नईला निघून गेले.

(पान वर वरून )

# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग --२
## जमिनीसंबंधी महत्त्वाचे उतारे

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

**७.२ गाव नमुना बारा पिकांची नोंदवही) उतारा**

**गाव नमुना १२ या उताऱ्याला सहसा गाव नमुना १२ असे कोणी म्हणत नाही. याचे कारण म्हणजे गाव नमुना सात व गाव नमुना बारा असे उतारे हे एकत्र असतात आणि त्यामुळेच या दोहोंचा मिळून ७/१२ चा उतारा असे म्हटले जाते. कित्येक लोकांना तर या ७/१२ म्हणण्यात दोन उतारे अभिप्रेत आहेत याचे ज्ञानदेखील नसते. म्हणून आपण आता गाव नमुना १२ मधील माहिती कशी असते ते पाहूया. त्यासाठी आपण एका गाव नमुना बाराचे चित्र पुढील पानावर पाहूया.**

**अनुक्रमांक १ -** या ठिकाणी या उताऱ्याचे नाव दिलेले असते. यावरून आपणाला हा उतारा कोणता आहे याची माहिती मिळू शकते. यालाच पिकाची नोंदवही असेदेखील म्हणतात. यावरून या उताऱ्यात आपल्याला जमिनीसंबंधी कोणती माहिती मिळू शकते हे समजते. पिकांचो नोंदवही म्हटल्याबरोबरच आपल्या लक्षात येते की या उताऱ्यात आपणाला जमिनीतील पिकांविषयीची माहिती मिळेल.

**अनुक्रमांक २ -** या ठिकाणच्या मजकुरावरून हा उतारा कोणत्या कायद्याअंतर्गत तसेच कोणत्या नियमांतर्गत दिला गेला आहे याचे ज्ञान आपणास होते. या ठिकाणी आपल्या लक्षात येईल की गाव नमुना सात व गाव नमुना बारा हे वेगवेगळ्या नियमाखाली बनवले गेले आहेत. गाव नमुना सात हा ३, ५, ६ व ७ नियमांतर्गत बनवला जातो तर गाव नमुना १२ हा नियम २९ अंतर्गत बनवला जातो. **त्यानंतर आपण पुढील अनुक्रमांकाकडे वळूया.**

**अनुक्रमांक ३ -** या ठिकाणी पिकाची नोंद कोणत्या वर्षी केलेली आहे ते वर्ष लिहिलेले असते. म्हणजे पुढील आकडेवारी कोणत्या वर्षाची आहे हे आपल्या लक्षात येते.

**अनुक्रमांक ४ -** हंगाम या सदरात कोणत्या हंगामात ही माहिती गोळा केलेली आहे याबद्दल माहिती इथे दिलेली असते. यावरून कोणत्या कालावधीत कोणती पिके या जमिनीत घेतली जातात हे बघण्यास मदत होते. याशिवाय खरीप आणि रब्बी असेदेखील हंगाम असतात यापैकी कोणत्या वेळच्या हंगामात पीक घेतलेले आहे ते या ठिकाणी समजते.

**अनुक्रमांक ५ -** याखाली एकाहून अधिक पिके घेणाऱ्या जमिनीचे क्षेत्र किती आहे हे आपणाला समजते म्हणजे पिकाखाली असणाऱ्या जमिनीची मिश्र पिकाखालील जमीन व निर्भेळ पिकाखाली किती क्षेत्र आहे या दोन विभागात जमिनीचे क्षेत्र लिहिले जाते. याशिवाय मिश्र पिकाखालील जमीनीचा तपशील पुढे दिलेला असतो-

**अ)** मिश्र पिके किती प्रमाणात घेतलेली आहेत? मिश्रणाचे प्रमाण काय? त्यास काही क्रमांक आहे किंवा काय? आदी माहिती आपणांस या ठिकाणी मिळते.

**ब)** या क्षेत्रातील जलसिंचित क्षेत्र या जागी दाखवलेले असते. ते देखील हेक्टर आर मध्ये दाखवण्याचा प्रघात आहे.

**क)** सिंचनक्षेत्रात नसणारी, परंतु मिश्र पीक घेत असलेली जमीन किती आहे याचा तपशील या ठिकाणी दिलेला असतो. हे क्षेत्रदेखील हेक्टर व आरमध्ये दाखवण्याची पद्धत आहे.

**ड)** या जागी कोणकोणती पिके घेतली जातात याची माहिती दिलेली असते. घेतलेल्या पिकांची माहिती आपणाला मिळते.

इ) एकूण जमिनीपैकी कोणत्या पिकाखाली किती जमीन सिंचनाखालील आहे याची माहिती दिलेली असते.

फ) या जागी मिश्र पिकाखालील, परंतु जेथे सिंचनाची सोय उपलब्ध नसते असा जमिनीचे क्षेत्र आपणाला या ठिकाणी मिळते.

**अनुक्रमांक ६ -** या ठिकाणी एकाच पिकाखाली म्हणजे जी मिश्र पिकांच्या लागवडीखाली येत नाही अशी जमीन किती, तिचे क्षेत्रफळ किती हे दर्शवलेले असून याशिवाय पुढीलप्रमाणे अन्य माहितीदेखील त्यामध्ये देण्यात आलेली असते.

क) या ठिकाणी एकाच पिकासाठी जमीन कसतात त्या पिकाचे नाव दिलेले असते.

ख) या ठिकाणी जलसिंचनाची सोय असलेली जमीन किती याचा तपशील दिलेला असतो.

ग) या ठिकाणी एकाच पिकाखालील, परंतु सिंचनाची सोय नसलेले जमिनीचे क्षेत्र किती हे दर्शविलेले असते.

**अनुक्रमांक ७ -** या ठिकाणी लागवडीसाठी उपलब्ध नसलेल्या जमिनीची माहिती दिलेली असते. आता त्यामध्येसुद्धा सदर जमीन लागवडीसाठी का उपलब्ध नाही व त्याचे क्षेत्रफळ किती याची माहिती प क्रमांकाच्या पोटभागात दिलेली असते. त्यावरून अशा लागवडीसाठी उपलब्ध नसणाऱ्या जमिनीचा तपशील आपणास एकाच ठिकाणी मित्र शकतो.

घ) लागवडीसाठी उपलब्ध नसणाऱ्या जमिनीचे स्वरूप या ठिकाणी सांगितलेले असते. म्हणजे त्यावरून सदर जमीन कायमस्वरूपी लागवडीला उपलब्ध होईल किंवा नाही याची माहिती त्यामध्ये मिळते.

च) या ठिकाणी अशा लागवडीसाठी अयोग्य असणाऱ्या जमिनीचे क्षेत्रफल किती ते दिलेले असते.

**अनुक्रमांक ८ -** यामध्ये जमीन जर ओलिताखाली येत असेल तर त्यासाठी सिंचनाचा कोणता प्रकार उपलब्ध आहे याचा तपशील दिलेला असतो. उदा. देऊन बोलायचे झाल्यास विहीर, सामाईक विहीर, पाटाचे पाणी, धरणाचे पाणी, कालव्याचे पाणी इत्यादी.

**अनुक्रमांक ९ -** या ठिकाणी सदर जमीन कोण कसतो याची माहिती असते. कित्येक वेळा मालक व कसणारा हे वेगवेगळे असतात. अशा वेळी जमीन कसणाऱ्याचे नाव त्या ठिकाणी लिहिले जाते. जर मालक स्वतः जमीन कसत असेल तर त्या ठिकाणी खुद्द म्हणून नोंद होते.

**अनुक्रमांक १० -** या ठिकाणी या जमिनीच्या संबंधाने काही शेरे असतील तर ते लिहिलेले असतात. किंबहुना काही वेळा जमिनीच्या अनुषंगाने शेरे लिहायचे असल्यास त्यासाठी जागा सोडलेली असते.


**अनुक्रमांक ११ -** या ठिकाणी ७/१२ चा उतारा कोणत्या तारखेला दिला ती तारीख दर्शविलेली असते. ही फार महत्त्वाची असते; याचे कारण म्हणजे या दिवसापर्यंतच्या नोंदी दप्तरावरून या उताऱ्यात आलेल्या असतात.

**अनुक्रमांक १२ -** या ठिकाणी ज्या तलाठ्याने हा उतारा दिला असेल त्याची सही व शिक्का असतो. तसेच या ठिकाणी असणाऱ्या रबर स्टॅंपवरून आपणास ही जमीन कोणत्या तलाठी सजामध्ये येते याची माहिती होते.

या साऱ्या माहितीवरून ७/१२ च्या प्रत्येक माहितीचा अर्थ काय होतो? त्याचा उपयोग काय आदी सारी माहिती आपणाला मिळाली. अर्थात वर दर्शविलेल्या उताऱ्यापेक्षा वेगळ्या नोंदी असणारे ७/१२ देखील असतात. असेच काही महत्त्वाचे ७/१२ चे उतारे आपण आता पाहूया. अर्थात असे जे नमुन्यादाखल अन्य ७/१२ चे उतारे आपण पहाणार आहोत त्याची वरप्रमाणे सर्व माहिती न पहाता वरील माहितीहून वेगळी असणारी बाबच आपण लक्षात घेणार आहोत व त्याचीच माहिती आपण या ठिकाणी करून घेणार आहोत.

हे सर्व करत असताना आणखी एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की यातील भूमापन नंबर, भोगवटादारांचे नाव, ६ अ वरील फेरफार नोंदीचे अनुक्रमांक आदी सर्व गोष्टी काल्पनिक आहेत. त्याच्यामध्ये कुठे साधर्म्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. आता आपण अन्य ७/१२ च्या उताऱ्यांकडे वळूया.

**सातबाराच्या उताऱ्यात निरनिराळ्या नोंदी असतात. त्या कशा असतात कोणत्या ठिकाणी असतात हे समजण्यासाठी काही सातबाराचे उतारे-**



या ७/१२ च्या उताऱ्यात इतर अधिकारात अर्बन बँकेचा बोजा दाखवला आहे. याच पद्धतीने याच ठिकाणी निरनिराळ्या कर्जांचा बोजा ७/१२ च्या उताऱ्यावर दाखवण्यात येतो. उदा. भूविकास बँक, तगाई, जिल्हा मध्यवर्ती बँका इत्यादी.

क्रमश :




# पुंसवन, अनवलोभन व सीमंतोन्नयन संस्कार

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

**मागील भागात आपण ' गर्भाधान ' संदर्भात थोडक्यात माहिती घेतली. गर्भाधानानंतर गर्भधारणा झाल्याचे निश्चित निदान झाल्यावर गर्भस्पंदन सुरू होण्यापूर्वी तसेच गर्भाचे लिंग व्यक्त होण्यापूर्वी पुत्र होण्याच्या अपेक्षेने साधारणतः दुसऱ्या महिन्यात किंवा तिसऱ्या महिन्यापर्यंत ' पुंसवन संस्कार ' केला जातो.**

पुत्र प्राप्तीच्या अपेक्षेने केला जाणारा हा पुंसवन संस्कार पुरुषसंज्ञक नक्षत्रात चंद्र असता करण्याची पद्धत आहे. हा संस्कार कोणत्या नक्षत्रात करावा याबाबत विविध ग्रंथातून विविध तज्ञांची आणि शास्त्रवेत्त्यांची विविध मते मांडली गेली आहेत. चंद्र पुष्य नक्षत्रात असता हा संस्कार करणे विशेष लाभदायी ठरते असे सर्वमान्य आहे. तशात ' शास्त्र असे सांगते (भाग-१) ' या वेदवाणी प्रकाशनाच्या ग्रंथात अश्विनी, मृगशीर्ष, पुनर्वसु ,पुष्य, हस्त, श्रवण, पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा ही नक्षत्रे उत्तम असल्याचे सांगण्यात आले आहे. भरणी, कृतिका, रोहिणी, आर्द्रा, स्वाती, अनुराधा, पुर्वाषाढा व उत्तराषाढा ही नक्षत्रे मध्यम असल्याचे सांगितले आहे. त्यातही माझ्या मते गर्भवतीच्या जन्मनक्षत्रानुसार ताराचक्रातील वरीलपैकी शुभ पुरुषसंज्ञक नक्षत्र ( निसर्गतः क्रूर व तीक्ष्ण नक्षत्रे वगळून ) निवडणे अधिक उचित होईल. योग्य नक्षत्राबरोबर रविवार, मंगळवार व गुरुवार यापैकी एखादा पुरुषसंज्ञक वार असावा. पुंसवन संस्कार सोमवारी केला असता दुग्धनाश, बुधवारी केला असता मृत प्रजा, शुक्रवारी केला असता अंधत्व व शनिवारी केल्यास मृत्यू अशी अनिष्ट फळे सांगितली गेली असल्याने हे वार पुंसवन संस्कारासाठी टाळावेत.

शुक्ल पंचमीपासून कृष्णपंचमीपर्यंत चंद्रबल उत्तम असते म्हणून या कालावधीत चतुर्थी, नवमी व चतुर्दशी या रिक्तातिथी तसेच अमावस्या व पौर्णिमा या पूर्णातिथी टाळाव्यात. मिथुन लग्न टाळून मेष, सिंह, तुळ, धनु कुंभ यांपैकी विषम लग्न व विषम नवांश निवडावे. इतर काही कुयोग नसतील याची खात्री करून घ्यावी. अशाप्रकारे शुभ लग्न तसेच तिथी, वार, नक्षत्र, करण व योग ही शुभ पंचांगे या सर्वांचा सुयोग्य सुमेळ साधण्यासाठी अर्थात सुमुहूर्त साधण्यासाठी विद्वान ज्योतिषतज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे हे उत्तम. यासाठी गर्भवतीची अचूक वेळेची जन्मपत्रिका अत्यंत उपयोगी ठरते. येथे हे लक्षात घ्यावे की, प्रसूतीच्या वेळी बालकाच्या जन्माची अचूक वेळ अवधान राखून नोंद करणे अत्यंत जरुरीचे असते. अचूक जन्मवेळेनुसार तयार केली जाणारी जन्म कुंडली आणि जन्मपत्रिका आयुष्यात अनेक बऱ्या अथवा वाईट कालावधीत अत्यंत मार्गदर्शक ठरत असते.

पुंसवन संस्कारात वटवृक्षांच्या मुळ्या उगाळून त्यांचा रस गर्भवतीच्या उजव्या नाकपुडीत तिच्या पतीच्या हस्ते पिळला जातो. काही अडचणीमुळे त्यावेळेला पती उपस्थित असू शकत नसेल किंवा गर्भधारणेनंतर पती मृत पावला असेल तर दीर किंवा सासरे यांच्या हस्ते रस पिळण्याची कृती करता येते. हा रस गर्भवतीच्या नाकातून पोटात जावा अशी अपेक्षा असते. या कृतीत गर्भ आणि गर्भवती यांच्या आरोग्याचा विचार अंतर्भूत आहे.




अनवलोभन संस्कारात दुर्वा वाटून त्याची गोळी केली जाते. गर्भवतीला सजवलेल्या वाटोळ्या मखरात किंवा किमान सावलीत पूर्वेकडे तोंड करून बसविले जाते. तिच्या पाठीमागून तिचे मुख वरच्या दिशेला करून पतीच्या उजव्या हाताच्या अंगठ्याने दुर्वाची गोळी वस्त्रातून पिळून वस्त्रगाळ रस गर्भवतीच्या उजव्या नाकपुडीत सोडला जातो. यावेळी प्रजावदाख्य सूक्त तसेच जीवपुत्राख्य सूक्त पूर्वहितांकडून उद्घोषिली जातात. विष्णू देवता व प्रजापती यांच्यासाठी चरूची आहुती देऊन हवन केले जाते.

पुढे गर्भाची मेंदूशक्ती वाढावी यासाठी ' सीमंतोन्नयन ' संस्कार करण्याची पद्धत आहे. ' सीमंत ' म्हणजे केस आणि ' उन्नयन ' म्हणजे विंचरणे अर्थात ' सीमंतोन्नयन ' म्हणजे केस विंचरणे. सर्व तऱ्हेच्या क्रियांचे मूळ हे मनुष्याच्या मेंदूमध्ये मस्तकाच्या ठिकाणी असते. मस्तकावरील पंच संधी टाळूच्या ज्या ठिकाणी एकत्रित येतात त्याला ' सीमंत ' असे म्हणतात. ते स्थान जागृत करण्याच्या, उद्दीपित करण्याच्या उद्देशाने त्याचे विधीपूर्वक उन्नयन करणे म्हणजे सीमंतोन्नयन. दोन उंबराचे फळे असलेला देठ, सायाळाचा काटा व तीन दर्भ एकत्र करून त्यांनी पतीकडून गर्भवतीचे केस विंचरले जातात. या संस्कारासाठी सहावा किंवा आठवा महिना प्रशस्त मानला जातो. शनिवार टाळावा. गर्भवतीच्या जन्मपत्रिकेनुसार रविवार, मंगळवार व गुरुवार यांपैकी तिला शुभ फलदायी असणारा पुरुषवार घ्यावा. प्रतिपदा, तृतीया, पंचमी, दशमी यापैकी शुक्ल पंचमी ते कृष्ण पंचमी पर्यंतची तिथी घ्यावी. मुहूर्ताच्यावेळी लग्नकुंडलीत केंद्र व त्रिकोण या स्थानात शुभग्रह असावेत तसेच कुंडलीच्या तिसऱ्या व सहाव्या स्थानात पापग्रह असावेत. चंद्र कुंडलीच्या सहाव्या, आठव्या व बाराव्या स्थानात नसावा. जन्मलग्नरास व चंद्ररास यापासून आठव्या राशीचे लग्न असू नये तसेच लग्न स्थानी पुरुष राशी व पुरुष नवांश असावा.


शास्त्राधाराने पुंसवन, अनवलोभन व सीमंतोन्नयन हे तिन्ही संस्कार एकत्रितही करता येतात. काही अडचणी उद्भवल्यास पुढे आठव्या महिन्यात हे संस्कार एकत्रितपणे केले जातात. या तिन्ही संस्कारातून गर्भ सुसंस्कारीत, सुदृढ व बलवान होणे, गर्भपात टळणे आणि गर्भातील अपत्याच्या मेंदूची बुद्धिमत्तेची व अवयवांची सुबद्ध यथोचित वाढ होऊन पूर्ण दिवस् भरल्यानंतर बुद्धिमान पुत्राची प्रसुती होणे हे सर्व हेतू साध्य होतात असे ग्रंथांतून सांगितले आहे.

## व्हॅलेंटाईन वीक' की स्वैराचाराला मोकळीक ?

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे 'इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई






# गड किल्ल्यातील दगड घडाइचे कौशल्य



'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र'

लेखक : विलास भि. कोळी
संपर्क. 9763 08 4499
kolivilas2@gmail.com

आपल्या पूर्वजांनी उगाच म्हटलेलं नाही राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा. महाराष्ट्राचा सर्वात जुना सोबती कोण? महाराष्ट्रावर सर्वाधिक प्रभाव कोणाचा ? महाराष्ट्राची खरी ओळख काय ? महाराष्ट्र समजून घेण्यासाठी कुठून सुरुवात करावी ? या सर्वांचे उत्तर एकच तो म्हणजे आपल्याकडील काळा खडक. (अर्थात ब्लॅक बेसाल्ट) कारण तो समजल्याशिवाय आपणाला महाराष्ट्र समजणार नाही. आणि आपली संस्कृतीही समजणार नाही. महाराष्ट्र घडविण्यात दगडाचा फार मोठा वाटा आहे.


शैलीतील अलंकृत स्तंभ कमान

किल्याचे बांधकाम त्या काळात कसलीही साधने नसताना कसे करत असतील हा प्रश्नच आहे. नियोजन बद्ध कामकाज हेच त्याचे कारण आहे. कल्पक व्यक्ती त्यासाठी नियुकत केल्या जात असत. ते सर्व कामांचे व्यवस्थीत नियोजन करून घेत व काम पूर्ण करत. किल्ला बांधणे एक अति कष्टाचे काम होते. त्याप्रमाणे सुरू असलेल्या या कामावर देखरेख ठेवण्यासाठी अनेक अधिकाऱ्याची गरज असे. शिवछत्रपतींच्या जवळ अशी अनेक रत्ने होती. कोणत्याही पद्धतीचे बांधकाम करताना केवळ नैसर्गिक साधन संपत्ती व मनुष्यबळ उपलब्ध असुन चालत नाही. त्यासाठी अजुनही एका गोष्टीची आवश्यकता असते. ती म्हणजे स्थापत्य शास्त्रातील निष्णात तंत्रज्ञ किंबहुना अशा तंत्रज्ञानाविना कोणतेही बांधकाम पूर्णत्वा प्रत जाऊच शकणार नाही. दुर्गाच्या


शरभ शिल्प


बांधकामाच्या शास्त्राचा विचार केला तर स्वत: छत्रपती या शास्त्रातील एक तज्ञ होते आणि त्यांनी नेमलेली शास्त्रांच्या संबंधित मंडळी ही त्या शास्त्रातील अतिकुशल अशीच असायला हवीत. की ज्यांच्यावर जबाबदारी टाकून राजा केवळ देखरेख करण्याकरता मोकळा राहू शकेल. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, दहा दहा वर्षे चालणारी दुर्ग बांधणीची ही प्रचंड कामे समर्थ पणे तांत्रीक दृष्ट्या परीपुर्णतेने पेलु शकणाऱ्या व्यक्ती हाताशी आसल्याविना पुर्ण होने केवळ अशक्यप्राय ठरते. सबंध पहाड कोरुन त्यामध्ये गडकिल्ले उभारण्याची स्थापत्य कला शास्त्रीय पणे उपयोग केला जात असे. शास्त्रीय आराखडा तयार केला जात असे. कलावंत, स्थपती यांच्या मध्ये अखंडपणे संवाद असे. किल्ल्याचे बांधकाम करताना दिशा, सुत्र, गुणवत्ता, वेळ विचारात घेतली जात असे. ज्ञान, विज्ञान, संस्कृती आणि मराठे प्रसार यामध्ये अपुर्व समन्वय साधला आहे.

महाराष्ट्रातील शिवकालीन बांधकामात काळ्याभोर बेसाल्ट दगडाचा उपयोग फार मोठया प्रमाणात केला गेला आहे. बांधकामा साठी लागणारा घटक म्हणजे भक्कम असा दगड तर तो सह्याद्रीमध्ये भरपुर प्रमाणात मिळतो. त्यामुळे येथील कारागीरांना याची उणीव कधीच भासलेली दिसत नाही. जिथे किल्ला बांधायचा आहे त्याच्या पूर्व नियोजनाप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी दगडाच्या खाणी काढल्या जात. त्या दगडाच्या चाचण्या घेत, तो दगड बांधकामासाठी योग्य आहे याची खात्री झाल्यावर खाणीतून दगड काढणे तो घडविणे सुरु होई. खाणीसुद्धा अशा जागी काढत की गड किल्ल्याच्या माथ्यावर पडणाऱ्या पावसाचे थेंब न थेंब नैसर्गिक उतारावरून वाहत येऊन दगडाच्या खाणी मध्ये साठत असे. त्यामुळे आपसुकच पाण्याची गरज भागवणारे पाण्याचे टाके तिथे निर्माण होत असे. यामुळे दोन कार्य साधली जात. पहीले असे की दुर्ग बांधणीसाठीं लागणारा दगड किल्ल्यावरच जागेवर उपलब्ध होत असे आणि दुसरे म्हणजे किल्ला राबता झाल्यावर पाण्याची अगदी गरजही भागवली जात असे.

गड किल्ल्यावरील पाण्याचे टाके पाहील्यावर मनात एक विचार आल्याशिवाय राहत नाही. की हे योगायोगाने घडलेले नव्हते तर त्यामागे त्या काळातील दगड घडवणाऱ्या लोकांचा विचार दडलेला होता. आणि हे सर्व पुर्व नियोजीत होते असे मोठया विश्वासाने म्हणता येईल. हे पुर्वनीयोजन किती सुक्ष्म असेल याचा अंदाज येतो.





# सरकारी योजना/नोकरी

## कौशल्यातून रोजगार निर्मिती

**देशात रोजगार यंत्रणा सर्वप्रथम 1945 मध्ये माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी स्थापन करण्यात आली. त्यानंतर 1949 पासून सर्व प्रकारच्या बेरोजगारांची नावनोंदणी करून विविध उद्योजकांकडे उमेदवारांची नावे पाठविण्याचे कार्य सुरू करण्यात आले. रोजगार कार्यालये महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयात सुरू करण्यात आली. रोजगार कार्यालयामार्फत करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या कामांची, योजनांची तसेच नोकरीच्या संधी उमेदवारांना माहिती देणे इत्यादी महत्वाची कामे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामार्फत विनामूल्य केली जातात. या विभागाचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले असून कामामध्ये पारदर्शकता व जलदपणा येत आहे. येत्या काळातही जिल्हास्तरावर शंभर दिवसाचा कृती कार्यक्रम निश्चित केला आहे. या अनुषंगाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या जिल्ह्यातील आतापर्यंतच्या वाटचालीचा या लेखाद्वारे आढावा घेण्याचा हा प्रयत्न...**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला जगात अग्रेसर बनविण्यासाठी कौशल्य विकासाच्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पातही आगामी पाच वर्षात 4.1 कोटीहून अधिक युवकांना रोजगार आणि कौशल्यविकासाच्या संधी देशात निर्माण करण्यासाठी दोन लाख कोटी रूपयांची तरतूद केली आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने प्रसिद्ध केलेल्या भारताच्या रोजगार 2024 अहवालानुसार, भारत हा 2026 पर्यंत सर्वाधिक तरुणांचा देश असेल. ग्रामीण व शहरी विकासातील दरी दूर करून प्रत्येकाला समान संधी देण्यासाठी शासन तत्पर असून देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे.

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि 'मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष' यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविली जाणार आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि उद्योजक आणि रोजगार देणाऱ्या विविध आस्थापना यांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे. ही योजना राज्यभर यशस्वीपणे राबविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आयुक्त निधी चौधरी (भा.प्र.से.) यांच्या देखरेखीखाली विभाग काम करीत आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग हा रोजगाराभिमुखविभाग आहे. या विभागाच्या विविध योजना व उपक्रम असून https://mahaswayam.gov.in हे विभागाचे संकेतस्थळ कार्यरत आहे. याद्वारे उमेदवार किंवा उद्योजक कार्यालयात न येता आपली नोंदणी घरबसल्या इंटरनेटद्वारे किंवा त्यांच्याजवळ असलेल्या अँड्राईड फोनमधून rojgar.mahaswayam.gov.in या विभागाच्या वेब प्रणालीद्वारे करु शकतात. वाढती लोकसंख्या, बेरोजगारांची संख्या व नोकरीचे प्रमाण या सर्वांचा साकल्याने विचार करून विभागाच्या धोरणात व नावात महाराष्ट्र शासनाने कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता असे सुधारित नामाधिकरण केले आहे. नोकरीच्या संधी प्राप्त होण्यासाठी किंवा बेरोजगार युवक-युवतींनी स्वतः चा स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी त्यांना कौशल्य विकासाद्वारे निरनिराळ्या कौशल्याचे प्रशिक्षण विनामूल्य देण्यात येते. यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना 15 फेब्रुवारी 2011 रोजी करण्यात आली. या कार्यालयामार्फत जुलै, २०२४ ते डिसेंबर, २०२४ पर्यंत अनेक महत्त्वपूर्ण कार्यक्रम योजना व उपक्रम हाती घेण्यात आले.
'

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 6 हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना 8 हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना 10 हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे.**

## रेशीम शेतीची आस धरा, लक्ष्मी येईल तुमच्या घरा...

आपल्या देशात रेशीम धाग्याची मागणी जास्त असून उत्पादन कमी असल्याने रेशीम धागा इतर देशातून आयात करावा लागतो. त्यामुळे रेशीम उत्पादन वाढविण्यास आपल्याला चांगला वाव आहे. तुती रेशीम उद्योग हा प्रामुख्याने महाराष्ट्रातील 27 जिल्ह्यांमध्ये चालू आहे. टसर रेशीम उद्योग प्रामुख्याने पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यात पारंपारिक पद्धतीने चालू असून यातून आदिवासी भागातील शेतकऱ्यांना उत्तम जोडधंदा लाभला आहे.

नैसर्गिक रेशीम धाग्याला त्याच्या मुलायमप्रमाणे 'वस्त्रोद्योगाची राणी' असे संबोधण्यात येते. रेशीम कोष उत्पादन झाल्यानंतर त्यापासून रेशीम धागा निर्मिती करुन वस्त्र निर्मिती केली जाते. शासनामार्फत या योजनेचा विस्तार व विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. शेतीसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ घेऊन त्यांचे आर्थिक उत्पन्नात भर पडावी हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत व रेशीम संचालनालय, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.
नैसर्गिक रेशीम धाग्याची निर्मिती रेशीम अळीच्या कोषापासून होते. निसर्गात 4 प्रकारच्या रेशीम अळ्या आढळतात. मोठ्या प्रमाणावर तुती रेशीम कोष उत्पादन घेण्यासाठी तुतीच्या झाडांची सलग लागवड करावी लागते. तुतीच्या झाडांची पाने खाऊ घालून रेशीम कोष उत्पादन करणे याला 'रेशीम शेती' म्हणतात. हा एक कुटीर उद्योग असून शेतीला उत्तम पूरक जोडधंदा आहे. रेशीम अळ्यांचे संगोपन हे संगोपन गृहामध्ये करावयाचे असते. याकरिता संगोपन साहित्य व आदर्श पक्के संगोपन गृह बांधणे आवश्यक आहे.

रेशीम कोष उत्पादन व्यवसाय हा महत्त्वपूर्ण आहे कारण शेतीला उत्कृष्ट जोडधंदा आहे. अल्प कालावधीचे पीक असल्यामुळे पाल्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास दुसऱ्या वर्षापासून वार्षिक किमान पाच पिके घेता येतात. तुती लागवड केल्यानंतर 10ते 15 वर्षापर्यंत पुन्हा लागवड करण्याची गरज नाही. तुतीच्या फांद्या व अळ्यांच्या विष्ठेपासून उत्तम सेंद्रिय खत निर्मिती करता येते. घरातील व्यक्तीद्वारे सहज व सुशिक्षित बेरोजगार यांनी करण्यासारखा उद्योग आहे. इतर पिकांच्या तुलनेत पाणी कमी लागते. या व्यवसायात महिलांचा 50 ते 60 टक्के सहभाग आहे. शिवाय पर्यावरण पुरक व्यवसाय आहे.

**करा रेशीम शेती, पिकवा मातीतून मोती...**
रेशीम कोष खरेदी किमान आधारभूत किंमत व इतर राज्यात विकण्यास सुद्धा मुभा आहे. शिवाय तुतीचा शिल्लक पाला जनावराचे उत्तम खाद्य आहे. विद्यावेतनासह रेशीम शेती प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन व सवलतीचे दरात अंडीपूंज पुरवठा देखील करण्यात येतो. रेशीम कोष उत्पादन करणेसाठी शेतकऱ्यांकडे किमान एक एकर उत्तम पाण्याचा निचरा होणारी व बारमाही ओलीत असलेली जमीन असणे आवश्यक आहे. मात्र तुतीची लागवड इतर पिकांमध्ये करु नये. दुसऱ्या वर्षापासून 500 ते 600किलो कोषचे दिड ते दोन लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. 40ते 50 हजार पर्यंत खर्च येतो. म्हणजेच 1 लाख ते 1.5 लाख रुपये निव्वळ नफा एक एकर पासून मिळवता येतो.

नुकतेच अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी रेशीमरथाला हिरवी झेंडी दाखवून महारेशीम अभियान-2025 चे उद्घाटन केले. रेशीमरथाचा उद्देश तुती रेशीम उद्योग, रेशीम शेतीचे महत्त्व व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची शेतकऱ्यांना माहिती हवी तसेच शेतकऱ्यांना रेशीम शेतीसाठी नोंदणी करता यावी, यासाठी जनजागृती व्हावी, हा होय. चित्ररथाव्दारे अमरावती जिल्ह्यातील 14 तालुक्यातील 78 गावात रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिद्धी मोहीम तसेच नवीन गावे व शेतकरी निवड व नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तुती रेशीम उद्योग हा शेतीला उत्तम जोडधंदा आहे. जास्तीत -जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचे महत्त्व जाणून तुती रेशीम उद्योग करण्यावर भर द्यावा.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणीतील व्यक्तिमत्वे



राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# दिपाली महेश शिंदे प्रबोधन चळवळीतील गायिका

प्रख्यात गायिका दिपाली महेश शिंदे यांचा कार्यक्रम दोन वेळा एप्रिल, मे २०२३मध्ये ऐकला ,आवडला. मनोरंजना बरोबरच समाज प्रबोधन करण आता दुर्मिळ होतंय, अशी स्थिती असतांना आमचे कलावंत बंधू भगिनी चांगल्या दर्जाची गीते सादर करतात, तेव्हा त्यांच्या विषयी आदर वाटतो. कार्यक्रम संपताच मुद्दामच ताईंची भेट घेतली चर्चा केली . कोणताही कला वारसा नसतांना गाण्याची आवड होतीच पण लग्नानंतर पती आणि त्यांच्या कुटुंबाच्या प्रोत्साहनामुळे त्या गायनाकडे आल्या. माहेरच्या दिपाली भालेराव ,जांभुळपाडा पाली सुधागड गावच्या, चार बहिणी एक भाऊ. प्रतिकूल परिस्थितीतही वडिलांनी सातवी पर्यंत शिक्षणं दिलं. त्यानंतर प्रख्यात कवी महेश मालू शिंदे, पेण कुरनाड रायगड यांच्याशी त्यांचा विवाह झाला. कलाकार घराणं, त्यांचे मोठे बंधू जनार्दन शिंदे, मनोज शिंदे कवी कलावंत गायक सर्वांना परिचित.त्यांनीही आपल्या भावाच्या पत्नीस गायनासाठी मार्गदर्शन , प्रोत्साहन दिले. गीते लिहून दिली.

ताईंचे पती महेशजी शिंदे उत्तम हार्मोनियम वादक कवी गायक ,सासू सासरे पाठीशी मग माघार कसली?तसं पाहिलं तर मुली, महिलांनी या गायन कलेत येऊ नये आणि आल्याच तर त्यांनी जुगलबंदी कार्यक्रम करू नयेत हीच माहेर,, सासरची इच्छा असते. मायबाप रसिकांचं जर मनोरंजन झालं नाहीतर कार्यक्रम पुन्हा मिळण्याची शक्यता कमीच असते. मग आशय विषयाचं भान ठेवून गाणं म्हणाव लागत. बुद्धीला पटत नाही. एखादं द्विअर्थी गीत गाताना. पण जाणकार रसिक त्यातला योग्य तो बोध घेतात. कधीतरी मायमाऊल्या मुली जुगलबंदी कार्यक्रम ऐकत नाहीत.

आता परिस्थिती बदलत आहे. समाज सुशिक्षित झाला आहे. समजून घेतात. या समाजानं आमच्या संसार, उदरनिर्वाहसाठी हातभार लावला आहे.कार्यक्रम मिळतात ते ही एप्रिल मे मध्ये वीस पंचवीस कधी जास्त, कधी कमीही.मग वर्षात लग्न बारस वाढदिवस पुण्य स्मरण दिन पण यातून फारशी कमाई होत नाही. सहकलावांत, गाडीभाडे देऊन जे राहील त्यातून प्रपंच मुलांचं शिक्षण केलं. समाज कार्यकर्ते यांचं चांगलं सहकार्य मिळत अस दिपालीताई नम्रपणे म्हणाल्या. कोरोना आपत्तीत दोनअडीच वर्षे खूपच हलाखीत गेली पण जिद्द सोडली नाही.


कधीतरी सहकलाकारा सोबत गीतातून शाब्दिक चकमक होते. पण ते स्टेज मर्यादित असतं. नकळत त्याचा त्रासही होतो. रागावून चालत नाही असंही त्या म्हणाल्या. विशाल आणि जयेश या दोन्हीही मुलांनी त्यांच्या आवडीप्रमाणे उच्च शिक्षण घेतलं असून कला कार्याची त्यांनाही आवड आहे. धाकटा उत्तम तबला ढोलक वाजवितो. मोठा झी. टी. वर कार्यरत आहे. रेकॉर्डिंगचं तंत्रज्ञान उत्तम आहे. मुल मोठी झाली, शिकली आणि मग मलाही मग आपण शिकावं वाटू लागलं. २०१६ ते २०१८अग्रवाल कॉलेज कल्याण, मुंबई इथून दहावी, अकरावी, बारावीची परीक्षा दिली आणि प्रथम श्रेणीत पास झाले. पती आणि मुलाचं यासाठी प्रोत्साहन मिळालं. माणूस हा अखेर पर्यंत विदयार्थीच असतो त्यांनी शिकत पाहिजे हे त्यांनी बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीमाई जोतिबांची गीते गाता गाता स्वतःशिक्षण घेउन कृतीतून दाखविले. मी विचारलं गायन जुगलबंदी पहिला कार्यक्रम कधी कुणासोबत झाला तर १९९९ला राजू बागुल यांच्या सोबत आंबिवली येथे झाल्याच सांगितलं आणि पहिला गायन कार्यक्रम उल्हासगरमधी झाला. तिथं पासून महाराष्ट्रातील सर्वच नामवंत ते नवोदित कलावांत यांच्या सोबत जुगलबंदी कार्यक्रम आजतागायत होत असल्याचं म्हणाल्या.

दिर, पती यांची गीते गात असताना ज्येष्ठ कवी दिपश्याम मंगलवेढेकर आणि अन्य मान्यवर, नवोदित यांची गीते गात असते सांगितले. गेली पंचवीस वर्षात जवळ पास हजारो जुगलबंदी कार्यक्रम केले. कॅसेट, सी डी व्हीसीडीत आता युट्यूबला गाते आहे.

दिपाली ताईनी गायलेल

**"ओ शेठ तुम्हीं भिमामूळ झालात शेठ"**

**"हर्षली वसुंधरा, हर्शले गगन**
**हर्षित झाले दलितांचे मन बहुजनांचे मन "**



**तो आला आला, जयभीमवाला**

**लाख लाख दिवे लाविते**
**भिमारायला ओवालिते**

सन २०२३मधील नवीन गीत ख्यातनाम गायक मिलिंददादा शिंदे सोबत युटूबवर गायलं आहे.

**"खणखणते आज अशी भीमाच्या नावावाणी**
**अशी मोत्याच्या दाण्यावानी ग**
**ही जयंती सोण्यावानी."**

दुसरे म्हणजे ताईंनी गायिलेले बाबासाहेब आंबेडकर यांचा पाळणा गीत टी सिरिजल ला तीन मिल्यन्स लाईक मिळाले आहेत
अशी अनेक गीते उत्तमोत्तम्म गायली आहेत.
लोकांना समाजाला, रसिकांना जे चांगलं हवे आहे ते या गायनातून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. ताईंच्या गायनात मला शास्त्रीय संगीत बाज दिसला मी विचारलं तर हो मी शिकते आहे शास्त्रीय संगीत ,अगदी माझ्या मुलांच्या संगतीन गंधर्व महाविद्यालय मधून पाच परीक्षा उत्तीर्ण आहे संगीत मधल्या .आपण नवनवीन शिकल ,नविन बदल स्वीकारले तरच हल्ली टिकता येईल. कलेत ज्यांना आपल नावलॉकिक करायचं आहे त्यांनी नव आत्मसात करायला हवे.

कलाकारात बालवयात कलागुण, धडाडी असते त्यासाठी पालक शिक्षक यांनी जर लक्ष दिले तर कलाकार निश्चित घडतो. दिपाली ताई म्हणाल्या प्राथमिक शाळेपासूनच मला कविता ,गाण्याची आणि वर्गात नेतृत्व करण्याची आवड होती. बाई गुरूजींनी मला तशी संधी दिली. हजरजबाबीपणा तेव्हापासून आजही आहे.रेडिओ स्पीकरची गीते तेव्हा आजही आवडतात. समोरील कलावंत यांची गीते मी लक्षपूर्वक ऐकते,आपणास योग्य ते स्वीकारत असते.
२०१९मध्ये राहुल शिंदे दादा सोबत आणि २०२३मध्ये नवोदित कलाकार अर्जुन ओव्हाळ, गायक संजय गमरे यांच्या सोबत कार्यक्रम पाहिले ऐकले लोकगीत मनोरंजन पेक्षाही त्यांनी प्रबोधन सामजिक विषय ऐकविले. हल्ली सर्वच कलावंत असा प्रयत्न करत आहे. सध्या अशाच गीतांची गरज आहे. इतरांच्या भावना न दुखविता आपली चळवळ आणि समाज प्रबोधन महत्त्वाचं आहे. दिपालीताई शिंदे याचं पथाने गात,जात आहेत म्हणून हा शब्दप्रपंच. खर तर त्याकाळात परिस्थिती आणि उचित मार्गदर्शन मिळालं असत तर त्या शिक्षिका झाल्या असत्या हे त्यांच्या गाण्या बोलण्यातून जाणवलं.केवळ कलेच्या साथीने महाराष्ट्रात अनेक कलावंत आपला उदरनिर्वाह करत आहेत.त्यातीलच एक कवी महेशदादा शिंदे परिवार आहे.ताईन गात रहावं समाज प्रबोधन करावे त्यांच्या कलेची समाजासह अन्य सामाजिक संस्था संघटनांनी उत्तम दखल घ्यावी त्यांचा मानसन्मान वाढावा . गेली अनेक वर्षे त्या गात आहेत यासाठी अभिनंदन आणि पुढील वाटचालीस मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा 🌹🌹 मंगल कामना.



# लागवट

## मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

परवा परबीन गजालेक येवन बसली. नायतरी दोपारनंतर परबीनीक कामा तरी काय असतत? तिका गजालेक आमचा घर बरा गावलाहा. आमच्या सासुबायक तेवढाच व्हया असता. म्हातारपणाकडे एकदा झुकलाव की मग दोपारची झोप खय कोणाक येता? मगे ती परबीनीक बोलयता. दोघीजणा सांचेसर मस्त साठीत बसतत. परबीन तशी काय सासुबाय सारखी म्हातारी न्हय. ती माझ्याच वयाची जेमतेम. पण तिका तिची बोंडा खपवूक कोण तरी व्हया असताच ना. तिका माझ्या सासुबायचो थारो बरो गावलोहा. दोघायजणा मस्त बसान साठीत असतत. त्येंची साठा ऐकता ऐकता माका तर बाय दरोज दोपारी मस्त झोप लागता.

परवा परबीन नि माझी सासुबाय साठीत व्हती नि मी आपला गपचूप डोळे मिटून ऐका व्हतय. माझ्या सासुबायन परबीनीक विचारल्यान, परबीनी तुका लागवट म्हणजे काय ता म्हायत आसा काय गे? तशी परबीन म्हणाली, हो. माका म्हायत आसा. लागवट म्हणजे लागवड. परवाच तलाठी भाऊ आमच्या घरात इले व्हते. माझ्या घरवाल्यांक विचारी व्हते, नवीन काय लागवट केलास परबानु? मगे ह्योच म्हणाले, शंभर टक्के अनुदानातसून मिळालेली शंभर काजू नि पन्नास हापूसची कलमा लावलय. लागवट तर केलय. आता पुढचा सगळा हवामानावर अवलंबून. लागवट म्हणजे लागवड असाच मा?

तशी माझी सासुबाय म्हणाली, माका वाटललाच, तू असाच कायतरी लागवडीचा सांगतलस. अगो, लागवट वेगळी आणि लागवड वेगळी. तुझ्या घोवान जी कलमा लावल्यान त्येका लागवड म्हणतत. अगो, लागवट म्हणजे पुर्वी देवदिवाळी आणि गावपारध पडल्यावर गावातल्या पाषाणाचो, देवाचो हुकूम व्हायचो की उद्यापासून सड्यावरचा कराड म्हणजे गवात आणि लाकूडखोलो करूक हरकत नाय. असो देवाचो हुकूमाचो कौल झालो की गावात दवंडी फिरायची, लागवट लागलीहा.

उद्यापासून कराड कापूक, लाकूडखोलो करूक हरकत नाय. विशेष म्हणजे पुर्वी देवाचो असो कौल झाल्याबिगर गावातलो कोण नाय कराडाक हात घालायचो, नाय लाकूडखोल्याक. एकदा काय लागवट लागली की मग पुढे आपापल्या वाटपातला कराड कापा की लाकूडखोलो करा, कसली मनाई नाय. असो लागवटीचो कौल लागलो की अख्खो सडो, कोळमाचो आडवो, महापुरुषाचो आडवो माणसांनी फुलान जायचो. फुडच्या महिन्यात सड्यावर खय कराड नाय दिसायचा. लाकूडखोल्याचे माच छातीभर वर यायचे. राना-वना साफ व्हायची. लोकां, ढोरा रानातसून बिनधास्त फिरायची. कोकणात फिरतना घरासमोरच्या कुणग्यात, परड्यात शेणींचे, लाकडांचे माच, करडाचे उडवे दिसायचे. ह्या सगळा लांबसून बघताना कोकण किती सुंदर नि स्वर्गीय दिसायचा काय सांगा!

स्वयंपाकाचे गॅस इले नि ह्या सगळ्यावर शिरा पडली. पुर्वी घराघरातसून पेटणारे चुली, न्हाणये नि तेंच्यातसून निघणाऱ्या धूरान घरात नाय झुरळा न्हवायची, नाय डास फिरायचे. याशिवाय अशा धुरकटलेल्या घरात लाकडाक वाळवी वगैरे लागूची बिशाद नव्हती. आताच्या सारखी घरात पेस्ट कंट्रोल करुची गरज पडत नव्हती. आता खय कोण लाकूडखोलो करता? शेणी थापता? चुली पेटयता? नाय! सुखासीन





जीवन जगाच्या शर्यतीत आम्ही आमची परंपरा विसारलव. पळत्याच्या मागे धावत गेलव नि आता कपालावर हात घेवन बसलव. माझ्या सासुबायचे असे अनुभव ऐकून परबीनीची बोलतीच बंद झाली. मगे नमता घेय्त ती सासुबायक म्हणाली, आईनु माझे आज तुम्ही कान उघडलास. माका तर बाय ह्यो लागवट शब्दच म्हायत नाय व्हतो. आज तुमच्यामुळेच कळला की लागवट काय असायची नि तिचा महत्त्व काय व्हता. लागवट लागायच्या आधी खयच्या लाकडाक, करडाक हात घालूची कोणाची हिम्मत व्हयत नव्हती. समाजाचे नियमच तसे व्हते. आज ह्योंका घराक येवदे, परलो प्रश्न आधी ह्यो विचारतलय, अहो, लागवट म्हणजे काय ओ?



# पार्टेची मजा...

## मालवणी बोली



**रीना पास्ते परब**
**पुणे**

वसगो उठान भायर इलो, थण वारो त्याच्या कानात गेलो तसो तो घरात यवन कानाक टावेल बानान परत भायर गेलो. आजून गमा नाय होता. वसग्यान न्हानयेत आग केली. थयच तो चिऱ्यार बसान शेक घेय होतो. हात पाय शेकून तो उठलो. पानी सादारण गरम जाता हुनासर त्याना मशेरी लावन घेतली. मशेरी लावन गरम पानी घेवन त्वांड धुवन तो घरात इलो. आता बरा गमाक लागलंला. वसग्यान चाय ठेयली. चायची पात आला घालून त्याना कडक चाय केली. पेल्यात चाय वतून घेवन तो परत न्हानयेकडे इलो. गरम गरम चायचो घोट घेयत तो आजूबाजूची झाडा बगी होतो. सकाळचा ह्या भारी वातावरणात तो कदीच चुकय नाय. थणी असली काय त्याका चुलीकडे बसान चाय खावक आवडा. वसगो घोट घोट चाय खायत आजची कामा येवजी होती. तितक्यात दाजी थय इलो.

"वसग्या काय रे करतह...?" दाजी साद घालीत इलो.

"काय नाय रे... बसलय... आता बागात जातलय..." वसग्यान पेल्यार पानी घालीत हुतल्यान.

"अरे मिया काय हुना होतंय. आज बंड्याकडला काम सोपतला तर राती पार्टी करूया काय...?" दाजीन पार्टी करूचो इचार वसग्याक सांगलो.

"बेवडो बाळगो असलो तर मिया यवचय नाय..." वसग्यान सरळ उत्तर दिला.

"बाळगो नाय हा दोन दिस. मावड्याक जावचो हा दोंपारा..." दाजीन हसत हुतल्यान.

"बेवडो बाळगो नाय हा तर पार्टी करूक काय हरकत नाय..." सवगो तयार झालो. "आज पार्टी घराक नको करूया,



पयलाडच्या रानात जावन करूया..." दाजीन आज यगळो प्ल्यान केल्यान ह्या वसग्याक कळला. "आमची घरवालीन चार दिस नाय हा... आसली तरी तुमका काय करून देवची नाय... मिया पार्टेक नाय हुननय नाय पुन तुमका मदत काय करूक जमाची नाय..." वसगो बोललो तसो दाजी हुनाक लागलो. "अरे बाबा आपुनच सगळा करूया... दादो आसा त्याका भारी मटान बनवक यता... भात काय कटीन हा करूक... तडे जंगलात जावन करूया..." दाजी उस्साहान सांगा होतो. वसगो तयार जालो.

दाजीन काम करता करता पाच जनाक तयार केल्यान. दिस ढळता हुनासर दाजीन सगळी तयारी केली. सांजे चौकजान सवग्याच्या घराकडे इले. सवगोदुकू पिश्ये लागी करी होतो. "बसाक पलास्टिक घे रे..." मोनो बोललो. "आनकी काय रवाक नाय मा...?" दाजीन ईचारला... तांदूळ, मीठ, त्याल, टोप मोन्यान घेतलो. मटनाक व्हयाता दादोन घेतला. लायटर, माचीस, बॅटरी, कागद, जवक खोले, चार्जिंग केल्लो बल ह्या सगळा रामान घेतला. सवग्यान कुलाप केला. पाचव आंदार पडाक भायर पडले. जाता जाता किलोभर मटान घेतल्यानी. न्हय वलांडून फुडे जावन सपाट जागो बगून थयच सामायन आपटल्यानी. दादोन पटापटा काटया लागी केली. तीन गुंडे ठेवन पत्यारो लागी करून आदी जाळ केल्यान. आता शाप आंदार जायत इलो.बाजूकच मोन्यान दाजी वांगडा बारकोसो माटव केलो. सवगो व्हळातल्या झऱ्यातला टोपभर पानी घेवन इलो. दादोन तीन गुंडे लावन चूल केल्ली तेच्यार टोप ठेवन दुसऱ्या टोपातसून तांदूळ धुवन हाडल्यान. तवसर आदान तापला.सोमते तांदूळ शीजत घालून सवगो बसलो. रामान मटान धुवन हळद मीठ लावन बाजूक ठेयला. "चार्जिंग फुल करून बल हाडल हुनान बरा जाला..." दाजी बोललो. "बलाच्या उजेडान घसघशीत गमता. रानुक बरा पडला..." रामा बोललो. रामान पसरट गुंडो बगून त्याचार आला लोसून ठेचुन मटनाक लायला. तवसर दादोन कानो टमाटो बारीक चिरून खोल्यार ठेयल्यान. मोन्याक जवनातला काय जमा नाय हुनान तो बायकीचा काम करी होतो. त्याना माटव करून बुडी जागा करून पलास्टिकचे पिश्ये घातले. बाजूसून ताडपत्री गुनाळून मस्त झोपडी कशी केली. दाजीन खोले धुवन ठेयले.

भात जालो तसो दादो मटाण फोडणेक घालूक लागलो. त्यालात कानो टमाटो भाजून मसालो घातल्यान तसो घमघमाट सुटलो. सगळ्यांची भूक चाळावली. मसालो भाजलो तसो भुतूर मटान घालून बरा परतून वरते ढाकान मारून दादो बाजूक बसलो. "बंडो यव व्हयो होतो ना... मेल्याक जागराण जामना नाय हुनता..." दाजी बोला होतो. "बंडो यतलो असतो बायलेन नको हुतला असतला..." मोन्यान अंदाज लागलो. "अरे आमी काय घेणारे आसव काय... दारू खावन पडणारे आसत त्यांच्या वांगडा बरो जाता तो..." दादोन टोपावयला ढाकान बाजूक करीत हुतला. वाफेरच मटान शिजला ह्या दादोक कळला त्याना डब्यातला बारीक करून हाडलला खोबरा वतल्यान. बरो रसो खतखतलो तसो दाजी खोल्यार भात वाढूक लागलो. आंगाबरोबर रसो होतो. भातारच दादोन तो वाढलो. पाचयजान यकदम जवक बसले. चुलीत आग तशीच पेटा होती.

"वायच रवा रे..." दाजीन सगळ्यांका थामयल्यान... दाजीन पटकन उठान खोल्यार भात घेवन वरते रसो घालून बाजूच्या गुंड्यार ठेवन हात जोडल्यान. आजूबाजूक कोन आसात तर त्याच्यासाठी दाजीन पान बाजूक केला. मगे यवन तो जवक बसलो. सगळ्यांनी सुरवात केली. भारीच जाला रे मटान हुनत सगळे जवक लागले. थणी वायच वायच लागा होती. त्याच्यात असा गरम गरम जवक भारीच वाटा होता. पॉटभर जवन सगळे उठले. मोन्यान मोठासा लाकूड चुलीत लायला. रामान भांडी व्हळात बुडवन पिश्ये भरून ठेयली. किर्रर काळोक बाजूक होतो.

"आता घराक नको जावय हयच निजाया..." मोनो बोललो. सगळ्यांकाच निज येय होती. दाजीन बल माटवाच्या बाजूक लायलो. सवगो सोमतो ढूकाललो.

"आग पेटत रवा व्हयी रे... नाय तर जनावरा येतीत..." बोलता बोलता दादोन बाजूची काटया हाडून ठेयली.

"जाग इली काय आग सारीत रवा रे..." दादोन ताकीद केली ती आयकाच्या आदी सगळे घोरे होते. दादोन चारय बाजून बॅटरी मारून बगली. किर्रर रानात रातकिडे आरडा होते. दादो माटवाच्या पाटसून फेरी मारून इलो. पलास्टिकान सोयन कुडून घेतलंला होता. फुडे आग पेटा होती मोठा लाकुड तीन चार तास तरी पेटतला हेची खात्री करून दादो माटवात जावन भायरचो डीम जालल्लो बल बगीत शांत ढूकाललो....

# मूर्तिमंत अभिनयाची मानबिंदू -रीना रॉय

आई आणि बहिण-भावांच्या उदरनिर्वाहासाठी रीनाने वयाच्या केवळ १३ व्या वर्षी आपल्या चेहऱ्यावर मेकअप चढवला मात्र तिने यासाठी कधीही आपल्या परिवाराला दोष दिला नाही वा आपण कुटुंबाच्या चरितार्थासाठी हे काम करतोय याची कबुली दिली नाही. ती एक जबाबदार मुलगी होती, प्रेमळ बहिण होती मात्र ती व्यवहारी तरुणी खचितच नव्हती !रॉय यांनी स्टुडीओचे उंबरठे झिझवून स्क्रीन टेस्ट देण्याचा सपाटा लावला आणि सौदर्य बी.आर.इशारांनी बरोबर हेरले.

रीना रॉय यांची सुरुवात फारच वाईट झाली. बी.आर. इशारांनी त्यांना एकदम दोन चित्रपटासाठी साईन केले होते. त्यांचा ‘नई दुनिया नए लोग’ हा सिनेमा आधी फ्लोअरवर गेला, त्यात रीना रॉय यांचा नायक होता डेनि डेन्झोपा! या सिनेमाची आठवण अशीही आहे की यात रेल्वेचा एक सीन होता, सारे युनिट बेंगलोरजवळील जंगलात होते आणि हा सीन महत्वाचा होता. रेल्वे दिवसातून एकदाच तिथून जायची.त्यामुळे सीन चुकला तर रिटेकसाठी दुसरा दिवस उजडायचा. दोनेक दिवस असेच गेले, तिसऱ्या दिवशी बी.आर.इशारा वैतागले ते म्हणाले आता माझे पैसे संपलेत आणि एका शॉटसाठी सगळे युनिट जंगलात आणायचे मला परवडत नाही तेंव्हा आता चूक न करता तू शॉट दिला तर माझ्यावर उपकार होतील. रीना रॉय यांचे वय तेंव्हा फक्त १४ वर्षांचे होते ! मात्र इथे ती परत संवाद विसरली, रेल्वे आणि निघून गेली. सीन तसाच राहून गेला आणि पुढे जाऊन सिनेमाही डब्यात गेला. हा सिनेमा रिलीज झालाच नाही. त्या दिवशी रीना मात्र हमसून हमसून रडली. तिने पुन्हा असं चुकायचे नाही हा निश्चय मनोमनी केला तो थेट वर दिलेल्या ‘आशा’तल्या प्रसंगापर्यंत पाळला !

याच बी.आर.इशारा यांचा १९७३ मध्ये आलेला ‘जरुरत’ या सिनेमात असेच दृश्य होते ज्यात अस्ताला जाणारया सूर्याचे दृश्य सीनच्या पार्श्वभूमीला होते. या सिनेमात तिचा नायक होता तरणाबांड देखणा (पण ठोकळा) नायक विजय अरोरा ! इथे तिने सूर्यास्त नेमका पकडला आणि तिची गाडी रांकेला लागली. पडद्यावर आलेला ‘जरुरत’ हा रीनाचा पहिला सिनेमा ठरला होता. या सिनेमातील बोल्ड दृश्यामुळे नंतर रीना ‘जरुरत गर्ल’ या नावाने प्रसिद्ध झाली होती. जरुरतमुळे तिच्या नावापुढे रॉय कायमचे चिकटले. राजपूत रीनाचे बंगालीकरण झाले, मात्र तिने तेच नाव रिअल लाईफमध्येही धारण केले कारण तिला तिच्या बालपणीच्या कटू आठवणी विसरायच्या असाव्यात....

रीनाच्या सुरुवातीच्या काळात समीक्षक तिची तुलना आशा पारेखशी करायचे, रीनाला ते पटत नसे. आशा पारेख आणि माला सिन्हा नंबर रेसमध्ये कधीही वर जाऊ शकल्या नाहीत मात्र त्यांची शिडी वापरून अनेक ठोकळे अभिनेते आपला सिनेमा हिट करण्यात यशस्वी ठरले होते त्यामुळे रीनाला त्यांच्यासोबत आपली तुलना मान्य नसे. खरे तर लुक आणि गेटअपची जाण तिला रेखाने करून दिली. तिचा कपाळावरचा केसांचा महिरप आणि धनुष्याकृती मासोळी डोळे याचा योग्य वापर कसा करायचा याचे धडे तिला रेखाने दिले. मात्र रीनाला स्वतःची इमेज आणि करीअर यांची गंभीरता सुरुवातीला नव्हती, केवळ अर्थार्जन ह्या हेतूने तिने बी आणि सी ग्रेडचे ढीगभर सिनेमे तिने केले. **( क्रमशः_)**



# पुलाव



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**आज आपण पुलाव रेसिपी ही एक चविष्ट डिश आहे अशा या पुलावची रेसिपी सोपी आहे. चला, तयार करूया.**

**साहित्य**

- २ कप बासमती तांदूळ
- १ मध्यम आकाराचा कांदा (चिरलेला)
- १ मध्यम आकाराचा टोमॅटो (चिरलेला)
- १/२ कप गाजर, वाटाणे, बीन्स (चिरून)
- २ चमचे तूप किंवा तेल
- १ चमचा जिरं
- २-३ लवंगा
- १ दालचिनी तुकडा
- २ वेलदोडे
- १ चमचा आलं-लसूण पेस्ट
- १/२ चमचा हळद
- १ चमचा गरम मसाला
- १ चमचा धणे-जिरे पावडर
- १/२ चमचा लाल तिखट
- चवीनुसार मीठ
- ४ कप पाणी
- कोथिंबीर सजावटीसाठी
- १-२ चमचे काजू आणि बेदाणे (ऐच्छिक)

**कृती:**

- तांदूळ धुऊन भिजवा:
- तांदूळ स्वच्छ धुऊन १५-२० मिनिटे पाण्यात भिजत ठेवा.
- कढईत मसाले परता:
- एका भांड्यात तूप किंवा तेल गरम करून त्यात जिरं, लवंगा, दालचिनी आणि वेलदोडे टाका.
- कांदा परतून घ्या:
- चिरलेला कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परता. त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परतून घ्या.
- टोमॅटो आणि हळद-तिखट मसाले घाला:
- टोमॅटो, हळद, तिखट, गरम मसाला आणि धणे-जिरे पावडर घालून मिक्स करा. टोमॅटो मऊ होईपर्यंत परता.
- भाजी आणि तांदूळ घाला:
- गाजर, वाटाणे, बीन्स घालून मिक्स करा. त्यानंतर भिजवलेला तांदूळ निथळून घालून २ मिनिटे परता.
- पाणी आणि मीठ घाला:
- ४ कप गरम पाणी आणि चवीनुसार मीठ घालून हलवून झाकण ठेवा. मध्यम आचेवर शिजू द्या.
- पुलाव तयार करा:
- तांदूळ आणि भाज्या मऊ झाल्या की गॅस बंद करा आणि पुलाव ५ मिनिटे झाकून ठेवा.
- सजावट आणि सर्व्ह:
- पुलावमध्ये काजू, बेदाणे आणि कोथिंबीर घालून मिक्स करा. गरमागरम पुलाव रायता किंवा दह्यासोबत सर्व्ह करा.
- टिप:
- पुलाव अधिक स्वादिष्ट बनवण्यासाठी तुपात परतलेल्या काजू-बेदाणे घालू शकता.
- गोडसर चव आवडत असल्यास किंचित साखर घालू शकता.
- बासमती तांदूळ नसेल तर कोणताही सुगंधी तांदूळ वापरू शकता.
- आनंद घ्या चविष्ट आणि सुगंधी पुलावचा! ?

# 'शिक्षकांची अद्ययावत गुणवत्ता आणि 'इगो'....!'



श्री. धनंजय शेटये
गोळवण.
9619222709

आजमितीला महाराष्ट्रातील कित्येक शाळांमध्ये आठवी नववीच्या विद्यार्थ्यांना साधं वाचता येत नाही,लिहिता येत नाही. मग शैक्षणिक यंत्रणा काय कामाची? याला फक्त विद्यार्थीच जबाबदार आहेत का? तर मुळीच नाही ..!! गलेलठ्ठ पगार घेणारे शिक्षक काय करतात मग?साधे लिहिता वाचता येण्याएवढेही शिकवता येत नाही तेही आठवी नववीच्या वर्गात विद्यार्थी पोहोचे पर्यंत.....!! मग एवढी वर्षे काय केलं?? पगार कसला घेतला? विद्यार्थ्यांकडून आपण गुणवत्तेची अपेक्षा करतो ना? मग शिक्षकांजवळ गुणवत्ता असायला नको का?एवढं काम जमत नसेल तर मग या क्षेत्रात राहुन काही उपयोग नाही.मुळात हुशार असलेल्या विद्यार्थ्यांना हुशार बनविण्यात कसला आला मोठेपणा?? दगड असलेल्या मुलांना घडविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, कमकुवत, अभ्यासात मागासलेल्या ढ मुलांना घडविता आले पाहिजे. त्याना गुणवान बनविता आले पाहिजे तरच तो खरा हाडाचा शिक्षक होय.

शिक्षकांची गुणवत्ता आणि अध्यापन अद्ययावतता अतिशय महत्त्वाची असते. शिक्षकांने स्वतःला नेहमीच अद्ययावत करत विद्यार्थ्यांना अभ्यासामध्ये अभिरुची निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञानासोबत अध्ययनाच्या बाबतीत नवनवीन प्रयोग सातत्याने करत राहिले पाहिजे. परंपरागत शिक्षणपद्धती आता बोथट होत चालली आहे. आजच्या प्रसारमाध्यमांच्या युगात शिक्षकांनी आपला तंत्रज्ञानविषयक मागासलेपणा झटकून टाकला पाहिजे. विद्यार्थ्यांजवळ आज परिपूर्ण माहिती उपलब्ध होत असते.फक्त त्या दिशाहीन माहीतीला मुर्तरुप देऊन अध्ययन- अध्यापन प्रक्रिया सुलभ कशी होईल याचा अभ्यास व्हायला हवा.पण आजच्या काळात शिक्षकांमधील वैचारिक गुणवत्तारुपी स्पर्धा अध्ययन- अध्यापन प्रक्रियेस पोषक ठरत असते. पण शिक्षकांमध्ये नवनवीन गोष्टी शिकून घेण्याची इच्छा असली पाहिजे. 'मी' पण विसरता आला पाहिजे. 'मी' म्हणजे सर्वज्ञ, सगळ्यातले सगळे मला समजते. बाकीचे शिक्षक आपल्यापुढे म्हणजे लल्लूपल्लच आहेत.हा गर्व नाहीसा व्हायला हवा. फक्त सेवाजेष्ठता म्हणजे गुणवत्ता नसते. 'एवढी वर्षे मी शिकवत आहे माझं पाठ निरीक्षण कोणी करु नये' असे म्हटले तर त्या सेवाजेष्ठता असलेल्या बुजुर्ग अनुभवी शिक्षकाला आपल्या सिनियर असल्याचा गर्व चढल्याचे लक्षण आहे. पण शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने अशा 'मी' पणाच्या गोष्टी विकासात्मक अधोगतीची लक्षणे ठरु शकतात.

कनिष्ठ शिक्षकांना अतिशय दुय्यम समजणारे असे महाभाग शैक्षणिक पात्रतेच्या बाबतीतही कनिष्ठ शिक्षकांपेक्षा कमीच असतात. फक्त त्यांना गर्व असतो तो सेवाज्येष्ठतेचा! आपल्यामध्ये खरी गुणवत्ता असेल तर मग आपण आपल्या अध्यापनाचे पाठ निरिक्षण करायला विरोध कशाला हवा?त्या शिक्षकांच्या मनात एक नाहक भीती निर्माण झालेली असते आपल्यापेक्षा ज्युनिअर असलेला पण गुणवत्ता व शैक्षणिक पात्रतेच्या बाबतीत आपल्यापेक्षा वरचढ ठरला तर??? मुगलेआझमच्या जमान्यापासुन आपण शिकवत असलेली बोथट झालेली अध्यापन पद्धती आणि आपला सिनियरपणा काय कामाचा? आपला ज्युनिअर आपल्यापेक्षा पुढे गेला तर त्याला आपण आपल्या सेवाज्येष्ठतेचा गैरफायदा घेत नेहमीच उगाचच चूका नसतानाही चूका काढत ज्युनियर शिक्षकांना एका अवकातीत जखडून त्यांच्या गुणवत्तेला बंदिस्त ठेवले होते. जेवढा त्रास देता येईल तेवढा दिला होता आणि आता जर त्या ज्युनिअर शिक्षकांना भरभरून विद्यार्थी प्रतिसाद आणि अद्ययावत शिक्षण प्रणालीचे प्रभावशाली अध्यापन पाठ निरीक्षणातुन चांगली गुणवत्ता मिळवून आपल्यापेक्षा वरच्या पदावर बसला तर आपली काय हालत होईल? ही भीती हे एकमेव कारण पाठ निरीक्षणाचे असावे. मी पणाचा, सेवाज्येष्ठतेचा माज असेल,अविर्भाव असेल तर आपपरभाव, आपापसातील हेवेदावे यामुळे शैक्षणिक प्रगती मंदावण्याची शक्यता असते.शैक्षणिक प्रगती, उन्नतीही शिक्षकांच्या सांघिक प्रयत्नाचे यश असते. आपल्या अध्यापनातील काही चांगले गुण आपल्या अध्यापनातील काही त्रुटी आपल्या निदर्शनास आणून देण्याचे उत्तम साधन म्हणजे पाठ निरीक्षण! मग आपण अद्ययावत होण्यासाठी आपल्या पाठाचे तज्ञांकडून विशेष निरीक्षण व्हायलाच हवे.

आजच्या शिक्षणपद्धतीत शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणणे गरजेचे आहे. आज प्रत्येक विद्यार्थी हा कुठल्या ना कुठल्या शिकवणीला जातो, क्लासेस मध्ये जातो. शाळेतील वर्गात आपण अध्यापन करण्यापूर्वी त्या पाठाचे अध्यापन खासगी क्लासेसमध्ये झालेले असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना जुन्या बोथट झालेल्या परंपरागत अध्यापनपद्धतीचा, ब-याचवेळा वाजवलेल्या त्याच त्याच कॅसेटचा जणू कंटाळा आलेला असतो. मग आपण शिकवलेले अशा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणार तरी कसे? आपले वर्ग नियंत्रण तरी कसे होईल? आजचे विद्यार्थी सर्व ज्ञात असतात. त्यांच्यासमोर अध्यापनाची परिपूर्ण तयारी केल्याशिवाय जाणे योग्य नाही. तिथे आपल्या सिनियरगिरीचं मोठेपण काही कामाचे नसते. कठीणातला कठीण विषय सोप्यातल्या सोप्या पद्धतीने समजावून सांगणारा शिक्षक त्यांना हवा असतो.काही विषय विशेषज्ञ विभाग प्रमुख शिक्षक आपण कीती बुद्धीमान आहोत, किती जुने अनुभवी आहोत हे दाखवण्यासाठी पाठ टाचणात उगाचच त्रुटी दाखवून देतात, म्हणजे आपल्यासारखा विषयतज्ञ, एक्स्पर्ट या भुतलावर मी एकमेवच! असाच त्या सिनियर शिक्षकांचा आविर्भाव असतो. बरं असे महाभाग आपल्या शिकवण्याचा एखादा आदर्श पाठ आपल्या ज्युनिअर शिक्षकांना पाठ निरीक्षण करायला देत नाहीत. कारण विषयतज्ञ कसले? ह्यांच्या चुका कनिष्ठांनी दाखवून दिल्या तर तो केवढा मोठा अपमान?? अहो पण शिक्षक हा नेहमीच विद्यार्थी असतो. तो आयुष्यभर नवनवीन गोष्टी शिकत राहिला पाहिजे. तरच विद्यार्थ्यांना तो प्रभावी अध्यापन

(पान १३ वर)

# काव्यांगण



## आयुष्य, एक सुंदर प्रवास

## प्रवास

आयुष्याचा प्रवास
संपता संपत नाही...
अवघड घाट...
नागमोडी वळणं...
अवचित उतार...
सारंच अनपेक्षित!
मध्येच एखाद्या स्थळात
करावा लागतो मुक्काम
मांडत बसावी लागते...
झाल्या गेल्या आयुष्याची
त्रोटक आकडेमोड!
कधी बेरीज...
कधी वजाबाकी...
कधी गुणाकार...
तर कधी भागाकार!
कसंही भागा...
कुणालाही भागा...
तरीही...
बाकी शून्यच!
एखाद्या वळणावर
भेटतात सहप्रवासी...
एखादा वाटसरु...
आपल्यासारखाच....
आयुष्याच्या प्रवासाला निघालेला!
होतात गप्पा...
अळणी संवाद...
कधी वितंड...
कधी विसंवाद!
तरी एक बरंय....
शेवटचं स्थळ...
शेवटचा मुक्काम...
सगळ्यांचाच ठरलेला!
मात्र तिथपर्यंत पोहोचण्यासाठी...
ही धावपळ...
पळापळ...
कुतरओढ!
आता वाटतंय....
संपवून टाकावयास हवा
दररोजचा प्रवास....
एखादा मैलाचा दगड बनून
आराम करावयास हवा...
वर्षानुवर्षे!
मात्र...
कधी कोणास कळता कामा नये...
आपणदेखील होतो कधी...
याच रस्त्यावरचा...
ग्लान प्रवासी!

**बाबू घाडीगांवकर**



## जीवन – एक प्रवास

जीवन म्हणजे सागर अथांग,
कधी शांत, कधी प्रचंड तरंग।
कधी आनंदाचे मोती भेटती,
कधी दु:खाचे वादळ उसळती।।

कधी चंद्रकोर हसते गगनी,
कधी काळोख दाटून येई जिणी।
कधी स्वप्नांचे इंद्रधनु विरते,
कधी प्रयत्नांना नवे सूर जुळते।।

वाटेवरी संघर्ष अन् थोडी विश्रांती,
सुख-दु:खाची गुंफण ही नित्याची।
हसत-खेळत, शिकत पुढे जावे,
आपले अस्तित्व ठसा उमटवावे।।

कधी जिंकतो, कधी हरतो,
कधी स्वत:लाच नव्याने घडवतो।
प्रत्येक क्षण एक नवी शिकवण,
जीवन म्हणजे अविरत शिक्षण।।

म्हणूनच प्रवासाचा आनंद घ्यावा,
सुख-दु:खाचा सार्थ स्वीकार करावा।
मनात ठेवून विश्वास अपार,
जीवन सुंदर करूया साकार।।

**अनुपम वाघ**
**ग्वाल्हेर**

## जीवन प्रवास

जीवन प्रवास बाल्यावस्थेचा
सुखद निरागस बहुमोलाचा
अनभिज्ञ असे अर्थ तयाचा
विषय तो मात्र निखळतेचा!!१!!

पुढे ठाकले तारुण्य किशोरता
असे प्रेम ध्येय चिकाटी सचोटीचा
भावविश्व दृढ ऋणानुबंधांचा
निखळ मैत्री आणि विश्वासाचा!!२!!

युवाकाल असे जबाबदारीचा
कर्तव्य आणि समर्पणाचा
सर्वांना सांभाळून घेण्याचा
भक्कम पोशिंदा होण्याचा!!३!!

वृद्धावस्था काल अगतिकतेचा
आप्त स्वकीयांवर विसंबण्याचा
आराम मन;शांती विरंगुळ्याचा
पुनरपी बाल्यावस्थेत जाण्याचा!!४!!

असा हा प्रवास नित्याचा
कृती अनुभव संमिश्रतेचा
प्रत्येकाला पैलपार करण्याचा
लेखाजोखा तो असे परमेशाचा!!५!!

**सुखदा सयाजीराव गोरड,**
**दापोली**

आयुष्य जगण्याची
खरी मजा प्रवासात आहे,
एक सुंदर प्रवासच...
तुमचं आयुष्य सुंदर बनवतो !

आयुष्य एक पुस्तक आहे
त्यात रंग भरण्याचे,
जीव ओतण्याचे काम...
आपला प्रवासच करतो !

आयुष्य एक
सुंदर प्रवास आहे..
एखाद्या पक्षसारखे त्याला,
मस्त उडत उडत...
आपल्या आवडत्या ठिकाणी
जाता आलं पाहिजे !

आयुष्याचा प्रवास हा
प्रेमासारखा सदाहरित असतो,
त्याला कधीही अंत नसतो
त्यासाठी फिरलं पाहिजे !

आयुष्याच्या सुंदर प्रवासातले
आपण सारे प्रवासी घडीचे,
जन्मही एकदाच तोही क्षणभंगुर
तेव्हा सारे आनंदाने फिरून घ्या !
तेव्हा सारे आनंदाने फिरून या !!

**प्रा.के.एस.शिरबंदे,**
**दापोली**

## 'शिक्षकांची अद्ययावत गुणवत्ता आणि 'इगो'....!'

**(पान १२ वरून )**

करणार. अहंकारी शिक्षक विद्यार्थ्यांना कधीच घडवू शकत नाही. आपल्या विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी आपणच आप आपसातील मतभेद विसरून एकमेकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

आपल्या सेवाज्येष्ठतेपेक्षा गुणवत्ता असायला हवी. एखादा विषयतज्ञ हा शैक्षणिक पात्रतेच्या गुणवत्तेनं असणं गरजेचं आहे. मास्टर डिग्री म्हणजे त्या विषयाची पदव्युत्तर पदवी असायला हवी.M. A.,M. SC. अशा गुणवत्ता ह्या त्या विषयाशी संबंधित असायचा हव्या सेवाज्येष्ठता ही गुणवत्ता नसते. नुसतं अनुभवजेष्ठता असुन चालणार नाही.फक्त सेवाज्येष्ठता असलेले बुजुर्ग मास्टर डिग्री प्राप्त केलेल्या विषयतज्ञांचे मुल्यांकन कसे करतील? त्या विषयाचा सखोल अभ्यास करायला नको का?माकडाच्या हाती कोलीत देऊन चालत नाही. नाहीतर ते माकड सगळीकडे आग लावत सुटेल.विषयतज्ञ ही पोस्ट तरी गुणवत्ताधारक व्यक्तीला मिळायला नको का?? खरंतर शिक्षण क्षेत्रात वावरताना सर्वच शिक्षक प्रतिभावंत असतात.त्यांना डावा उजवा करण्यात काही तथ्य नसते. पण समानतेची ही मानसिकता सर्वांचीच व्हायला नको का? मातीच्या गोळ्याला आकार देणारा शिक्षकी पेशा हा सत्याच्या मार्गानेच चालला पाहिजे.पूर्वग्रहविरहीत सर्वंकष मुल्यांकन व्हायला हवे.मुल्यांकन करणारी व्यक्तीही तितक्याच ताकतीची असायला हवी,तरबेज असायला हवी.फक्त मी सांगेन तीच पूर्व दिशा म्हणणारा विषयतज्ञ काय कामाचा? अनुभवसिद्ध गुणवत्ता ही शैक्षणिक पात्रतेच्या गुणवत्तेनं दिसून येते. ग्रॅज्युएशन लेवलला स्वत: दोन ते तीन पेपर घेतले होते म्हणजे आपण विषय तज्ञ होत नसतो. खरा शिक्षक हा केवळ पुस्तक शिकवणारा नसावा तर अनुभुतीतून अध्यापन प्रक्रिया सुलभ करणारा असावा.फक्त शब्दांचे अर्थ सांगायला शिक्षक कशाला हवा?

**शिक्षक म्हणजे यंत्र नाही.अध्ययन अध्यापन ही प्रक्रिया अनुभूतीच्या साम्राज्यात आकार घेत असते. मुर्त अमूर्त कल्पना स्पष्ट करण्यासाठी विषयतज्ञ शिक्षकांची गरज असते.**

# वाचन संस्कृती



मत-मतांतरे

## वाचन संस्कृती...

वाचन हा आपल्या सुसंस्कृत जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे, नव्हे तो असलाच पाहिजे. वाचनामुळे आपल्या बुद्धीचा, जाणिवांचा, दृष्टिकोनाचा विकास होतो. हल्लीच्या वेगवान आणि धकाधकीच्या जीवनात वाचन काहीसे मागे पडले आहे. त्या वाचन संस्कृतीला, वाचन सवयीला योग्य मार्गावर आणणे जरुरीचे झाले आहे, कारण पुस्तके आणि त्यांचे वाचन हेच आपल्याला जीवनाचा मार्गदर्शक बनू शकते. ते कसे करता येईल याचा आपण आता विचार करू.

* मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री. राम जोशी सर त्यावेळी म्हणाले होते की, मातृभाषेत घेतलेले शिक्षण हे मानवी बुद्धीच्या, मेंदूच्या विकासाला आवश्यक असते. मातृभाषेत जेव्हा आपण शिक्षण घेतो, तेव्हा त्या भाषेतील जेवढे शक्य आहे तेवढे तरी साहित्य वाचणे हे अत्यावश्यक आहे, कारण केवळ शालेय पुस्तके वाचून तुमचे भावविश्व समृद्ध होऊ शकत नाही. त्यासाठी विविध लेखक, कवी यांची वेगवेगळ्या शैलीतील, वेगवेगळ्या स्तरांतील अनुभवावर आधारित पुस्तके वाचणे हे गरजेचे आहे.

* नवीन पिढी मध्ये एकूणच छापील पुस्तके वाचायचे प्रमाण फार कमी झाले आहे. अशा [illegible] आवड असणाऱ्या मंडळींनी पुस्तके ऑनलाईन वाचायची सवय लावावी. किंडल, आय पॅड स[illegible] पर्याय उपलब्ध आहेत त्याचा वापर करावा.
* धकाधकीच्या वेगवान जीवनात पुस्तकांच्या दुकानात जायला वेळ मिळत नसला, तरी अमेझॉन, फ्लिपकार्ट , बुक अँट क्लिक अशा ऑनलाईन पोर्टल वरून पुस्तके घरपोच मागवता येतात.
* बऱ्याचशा नामवंत मराठी लेखक, कवी यांचे साहित्य इंटरनेट वर उपलब्ध आहे, नव्या पिढीने अभ्यास करता करता, या साहित्याचा आस्वाद घेणे आवश्यक आहे. "... अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली.." असे आपण सहज लिहून जातो, पण ते कुणी लिहिले आहे, हे सुद्धा आपल्यास माहिती असायला हवे, तसेच नुसत्या उदहृत करायला दोन ओळी माहित असण्यापेक्षा ते संपूर्ण काव्य कधीतरी वाचलेले असेल पाहिजे.
* "वाचाल तर वाचाल" असे म्हटले जाते. ज्ञानोबा माऊलींनी आपली मराठी ही " अमृतातेही पैजा जिंके.." अशी भाषा आहे असे आपल्या सर्वांना सांगितले. अशा संपन्न भाषेमध्ये ज्ञानेश्वर माऊलींपासून ते आजकालच्या नवनव्या लेखक, कवींचे विपुल असे लेखन उपलब्ध आहे. या विशाल अशा सहित्यासागरातील काही थेंब जरी आपण प्राशन करू शकलो तरी आपले जीवन समृद्ध होऊ शकेल.
• हल्ली नवीन पिढीला बऱ्याच जुन्या चालीरीती, धार्मिक परंपरा, जुनी खाद्य संस्कृती याबाबत फारशी माहिती नसते. इंग्रजी माध्यमातील पाठ्यपुस्तकात सहसा या गोष्टी सांगितल्या जात नाहीत.आपल्या गौरवशाली इतिहासाची पण मोडतोड करून शिकवले जाते. अशा वेळी आपले वाचन जर समृद्ध असेल, तर 'नीर क्षीर' न्यायाने आपण या सर्व गोष्टी समजून घेऊ शकतो. आपल्या पारंपारिक चाली रीती, खाद्य पदार्थ, त्यांच्या कृती या सर्वांची माहिती आपल्याला मिळू शकते. फक्त यासतुमचे वाचन हवे. सर्वच गोष्टी ऑनलाईन मिळू शकत नाहीत, याचे भान हवे.

**©प्रकाश सरवणकर ९८६९२८०६६०**

## वाचन संस्कृती काल आणि उद्या

गझलकार इलाही जामदार यांच्या 'अंदाज आरशाचा' या गझलनवाज भीमराव पांचाळे यांनी गायलेल्या गझलेतील सुरुवातच एका प्रश्नाने होते. तो प्रश्न म्हणजे ' वाचलेली, ऐकलेली माणसे गेली कुठे?'. वाचनसंस्कृतीचा विषय समोर आला की हा प्रश्न पडतोच पडतो. 'वाचाल तर वाचाल' हे कित्येकवेळा कानावरुन, डोळ्याखालून गेलेले असते. कित्येक वक्ते आपल्या भाषणातूनही एक प्रभावी सुविचार म्हणून त्याचा वापर करतात.

वाचाल तर वाचाल असे नेहमीच म्हटले जाते. पण नुसते वाचन पुरेसे नाही. तर आपल्या वाचनात सखोलता हवी. अवांतर वाचन हवे. त्यामुळे सजगता येते. वाचन आपल्याला भरपूर लाभ मिळवून देते, जीवनाला सकारात्मक दिशा प्रदान करते. वाचन करणारी व्यक्ति वेगवेगळ्या पद्धतीने विचार करू शकतो. वाचन चांगला नागरिक घडवते. वाचनामुळे तुम्ही विविध क्षेत्रे जसे संस्कृति, कला, इतिहास इत्यादि क्षेत्राची माहिती मिळवू शकतात. वाचनामुळे तणाव दूर होतो. किती वाचले आहे यापेक्षा काय वाचले आहे, हा वाचन-संस्कृतीचा महत्त्वाचा निकष मानला जातो. विविध पुस्तके, ग्रंथ यांचे वाचन तर आवश्यकच आहे. परंतु नियमित प्रकाशित होणारी वर्तमानपत्रे वाचली जाणे हा वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरु शकतो.

वाचाल तर वाचाल' या सुभाषितात खऱ्या अर्थाने वाचनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. प्रत्येक साक्षर मनुष्याला वाचनाची आवड असेलच असे नाही. परंतु वाचनाची आवड असलेला प्रत्येक साक्षर मनुष्य सुसंस्कृत मात्र नक्की होऊ शकतो. वाचनाची भूक कधीही न संपणारी असते. एकाच बैठकीत एखादे पुस्तक जसे वाचून संपवता येते तसे आरामात पुस्तकाचा आस्वाद घेतही वाचन करता येते. वाचनातही प्रत्येकाची आवड वेगवेगळी असू शकते. या वाचनादरम्यान एखादे पुस्तक असे वाचनात येते की ते आपल्या जीवनावर प्रभाव पाडून जाते. तसं पाहायला गेलं तर वाचनाची सुरुवातच मुळी अंकलिपीने होते. अंकलिपीच्या वाचनाने अक्षरओळख झाली की एका वेगळ्याच दुनियेत आपण प्रवेश करतो. वाचनाचा छंद जोपासला की या दुनियेत वारंवार भ्रमंती करायला आवडते आणि कधी कधी तर तहानभूक विसरुन आपण वाचनात गुंग होऊन जातो.

अशी ही वाचनसंस्कृती कालही होती, आजही आहे आणि उद्याही असेल. पण प्रत्येक कालखंडात तिचे स्वरुप बदलत गेलेले आहे आणि बदलले जाणार आहे. आदिम काळात शिलालेख, भूजपत्रे इत्यादी साहित्यांमुळे वाचनसंस्कृतीने मूळ धरले. छपाईतंत्राच्या उगमानंतर छापील साहित्यामुळे वाचनसंस्कृती फोफावली. प्रगत तंत्रज्ञानामुळे ईवाचनाकडे वाचकांचा कल झुकू लागला आहे. साहजिकच वाचनसंस्कृतीला एक नवा आयाम मिळाला. भविष्यातही ती नवे रुपडे घेईल. त्यामुळे ती संपणार नाही एवढे निश्चित.

**🔒दीपक गुंडये.**

## वाचन संस्कृती काल आणि आज

एक काळ असा होता कि जाणकारांनी देऊ केलेले ज्ञान दोन्ही कानांनी ऐकून आत्मसात करणे हा ज्ञानार्जनाचा महत्वाचा मार्ग होता त्याच्या जोडीला बघून अनुकरण करून शिकणे हाही एक विकल्प होता कालनेमीक्रमाने ऐकलेला उपदेश अथवा सुविचार विस्मरणाच्या धुक्यात दिसेनासा होऊ नये याकरिता ते घोकून तोंडपाठ करायचा उपाय शोधून काढला असणार तद्नंतर लेखनकला जन्माला आली आणि विचार, भावना, शिकवण संकलित होऊ लागले असं दिसून येतंय हे जे विविध पुस्तकात, ग्रंथात, शीलेवर लिहिले गेले ते पिढ्यान् पिढ्या वाचलं जायला लागले

वाचन, पठण, मनन, चिंतन, चर्चा असे विविध टप्पे ओलांडून माणूस सुशिक्षित, सुविचारी बनू लागला. शिक्षणाचं अध्यन, अध्यापनाचं महत्व वाढत गेलं.विद्येला धनाचा, अस्त्रचा दर्जा मिळू लागला.अशिक्षित व्यक्ती म्हणजे दोन पायांवर चालणारा, शिंग व शेपूट नसलेला मख्ख प्राणी ही भावना बळावत गेली. ज्याला ज्याला संधी मिळाली तो कष्ट सोसून शिकून ज्ञानी बनू लागला, समाजात गौरवान्वित होऊ लागला.

पहाटे ब्राह्मि मुहूर्तावर उठून वाचन लेखन अर्थ समजून घेणे ही प्रक्रिया सुरू झाली. वाचनाची कला समृद्ध होऊ लागली. वाचनसंस्कृती उदयास आली. समाजात स्थित्यंतरे होत गेली कधी गरिबीमुळे, कधी आळशीपणामुळे, कधी विद्येची कृपा न झाल्यामुळे अनेक कारणांनी वाचन प्रवृत्तीची हेळसांड होऊ लागली "वाचाल तर वाचाल " " एक पाऊल शाळेकडे " इ. इ. घोषणा ऐकू येऊ लागल्या, नजरेस पडू लागल्या. हल्ली तर विज्ञानाने इतकी प्रगती केली आहे कि कागद, पुस्तक संस्कृती नष्ट होत चालली आहे .

कागदेतर शिक्षणाची आणि वाचनाची खूप सारी साधनं उपलब्ध होऊ लागली आहेत. त्यामुळे वाचनासाठी आवश्यक एकाग्रता, वेळ यांची त्रुटी भासू लागली आहे

**" वाच वाचुनी अति मी दमले,**
**थकले रे देवा "**

म्हणणारे भरमसाट झाले आहेत. अशात वाचनकला आणि वाचनसंस्कृती यांचं पुनरूध्दार व पुनरूत्थान करण्याची नितांत गरज भासू लागली आहे. वाचनालये व ग्रंथालये यांचं महत्त्व पटवून घेऊन छिन्नविछिन्न अथवा पडझडीला आलेल्या या आलयांची डागडुजी करून परत एकदा त्यांना उपयुक्त बनवायला हवंय. त्या बरोबरच नवनवीन ग्रंथ भांडारांची भरही घालायला हवी.

विद्यार्थीसमुहाला योग्य मार्गदर्शन करून त्यांचं मन पुन्:श्च वाचन प्रवृत्तीकडे वळवायला हवं" माझं पुस्तक हीच माझी ओळख " ही भावना रुजवायला हवी. शरिराप्रमाणेच मेंदूला देखील सकस आहाराची अर्थात उत्कृष्ट विचारांची, भावनांची, संस्कारांची नितांत गरज असते आणि त्याचा पुरवठा फक्त उत्तम पुस्तकंच करतात. मी पुस्तक प्रेमीच नव्हे तर पुस्तकवेडी आहे. पुस्तकवाचताना माझ्या नाडीचे ठोके बरोबर असतात, माझा श्वास छान लयीत जात येत असतो, माझं मन आनंदविभोर होत असतं, गाणं गात असतं, उड्या मारत असतं, नाचत असतं. जीवनात रंगबिरंगी होत असतं

**चला, तुम्ही देखील या वेडेपणाचा आनंद लूटा आणि स्वतःच्या व्यक्तित्वाला उंचावर घेऊन जा, व्यक्ती विकास करा आणि मनमुक्तीचा अनुभव घ्या. इंद्रायणीनं तुकारामांची गाथा तारली, तीच गाथा, तसलेच ग्रंथ, त्याच धर्तीची पुस्तकांचं वाचन आपण साऱ्यांना तरून नेईल.**

**डॉ प्रेमा मेणशी**
**बेळगावी.कर्नाटक**

## वाचन संस्कृती आज काल आणि उद्या

अगदी लहानपणापासून तुझ्या आवडीचा छंद कुठला? तर सहज लिहिले जाई वाचन! कालपरत्वे त्यात वाचन आणि पुढे लेखन असा शब्द जोडला गेला.
आज whatsapp वर लिहिले वाचले जाते तरी संग्रही छापील पुस्तकें असतातच. किंबहुना डोळ्यांचा नंबर हा लोकल मध्ये वाचूनच वाढलेला.(हवं तर डॉक्टरांना विचारा 😄)डोळ्यांचा त्रास सांभाळून आज ही वाचले जाते.
गेली दोन वर्षे मी एका मनपा शाळेच्या व्यवस्थापन समिती ची अध्यक्षा असल्याने शाळेत येणे जाणे नित्याचेच. मुलांशी बोलताना मला त्यांची वाचनाप्रती असलेली अनास्था प्रकर्षाने जाणवली. त्यांना वाचणे बोअरिंग वाटणे हे फक्त त्यांच्या दृष्टीनेच नव्हे तर एकूणच समाजाच्या दृष्टीने घातक ठरू शकते.
शाळेत सतराशे पुस्तके आहेत परंतु एकही पुस्तक उघडले गेले नव्हते. अगदी आजच मी volunteer म्हणून शाळेमध्ये रुजू झाले, सुरुवातीला मुले पुस्तक वाचण्यासाठी नाखूष होती. त्यांना pt साठी खाली जायचे होते पण प्रयत्नपूर्वक त्यांना पुस्तकांकडे वळवण्यात मला यश आले व बरीचशी पुस्तके मुलांकडून वाचवून घेतली मुलांनाही खूप आवडले (असावे). आता उद्या दुसऱ्या वर्गांवर जाणार आहे बघू काय होते ते. निदान मी तरी आशावादी आहे.

**सौ गौरी यशवंत पंडित, मुंबई**

## झाडांचे मित्र 🌳✨

एकदा एका सुंदर खेड्यात, हिरव्यागार झाडांनी भरलेला निसर्गपूर नावाचा गाव होता. हा गाव पक्ष्यांच्या किलबिलाटाने भरलेला, फुलांनी सुगंधित आणि हिरव्या शेतांनी सजलेला होता. गावातील माणसे झाडांना आपले मित्र मानत.


गावात बंडू नावाचा एक हुशार आणि खेळकर मुलगा राहत होता. तो रोज मित्रांसोबत खेळायला झाडांच्या सावलीत जात असे. गावात काळा सावळा नावाचा एक मोठा वटवृक्ष होता. या झाडाखाली गावातील सगळे लोक उन्हाळ्यात विश्रांती घेत, थंडगार वारा अनुभवत आणि गप्पा मारत. पण एके दिवशी गावात राघव सेठ नावाचा एक व्यापारी आला. त्याने गावकऱ्यांना मोठ्या पैशांचे आमिष दाखवून झाडे तोडण्याचा सल्ला दिला.
"ही झाडं तोडली तर मला चांगल्या किमतीला लाकूड मिळेल आणि तुम्हाला भरपूर पै. .ळतील," राघव सेठने सांगितले. काही गावकरी पैशांच्या लोभाने तयार झाले. हे ऐकून बंडूल. खूप वाईट वाटले. झाडे तोडली गेली तर गावाचे सौंदर्य नष्ट होईल, पक्ष्यांचे घरटे उध्वस्त होईल आणि उन्हाळ्यात सावली मिळणार नाही, हे त्याला समजले. तो झाडांचे मित्र वाचवण्याचा विचार करू लागला.

बंडूने आपल्या मित्रांसोबत चर्चा केली आणि एक योजना आखली. त्यांनी सगळ्या गावकऱ्यांना एकत्र बोलावले आणि काळा सावळा झाडाखाली गोष्टी सांगायला सुरुवात केली.
"आपण लहानपणापासून झाडांच्या सावलीत खेळलो, त्याच्या फळांवर वाढलो, पक्ष्यांचे गाणे ऐकले. पण आता हे झाड कापले गेले तर?" बंडूने विचारले.
"अरे हो! मग उन्हाळ्यात सावली कुठे मिळेल?" चिमणू दादा म्हणाले.
"आणि आपण जेव्हा उन्हाळ्यात पाणी प्यायला इथे थांबतो, तेव्हा काय होईल?" मंगळू काका म्हणाले.
"झाडे गेली तर आपले वातावरण उष्ण होईल. पाऊस पडायचा बंद होईल," बंडूने समजावले.
त्याच्या बोलण्याने सगळ्या गावकऱ्यांना जाग आली. त्यांना समजले की, झाडे तोडली गेली तर निसर्ग बिघडेल आणि नंतर त्याचा त्रास आपल्यालाच होईल.

गावकऱ्यांनी राघव सेठला थांबवले आणि ठरवले की, आपण झाडे तोडणार नाही, उलट नवी झाडे लावणार! "पैसे मिळतील, पण निसर्ग वाचला तरच आपण जगू शकतो," गावचे सरपंच म्हणाले. राघव सेठ नाराज झाला आणि तिथून निघून गेला. गावकऱ्यांनी मिळून झाडे वाचवली आणि नवीन झाडे लावली. काही वर्षांतच निसर्गपूर आणखी सुंदर बनले. पाऊस नियमित पडू लागला, पक्षी पुन्हा गोड गाणी गाऊ लागले आणि गावात समृद्धी आली.

बंडूच्या शहाणपणाने गावकऱ्यांना एक महत्त्वाची शिकवण मिळाली – झाडे हे आपले खरे मित्र आहेत, त्यांचे रक्षण करणे हेच आपले कर्तव्य आहे.
✨ "झाडे लावा, झाडे जगवा!" 🌿🌍

**यज्ञेश पाटील**
**MITपुणे**




## वाचन संस्कृती काल व आज

**"वाचाल तर वाचाल" या उक्तीप्रमाणे आपण सगळे वाचत आलो.आणि म्हणूनच वाचलो आजतागायत....**

आज जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला वाचन संस्कृतीचा विचार करताना प्रत्येक भाषेला लाभलेलं संस्कृतीचं वैभव अनुभवायला मिळते आहे. वाचनानेच आपण समृध्द व संस्कृतीला गौरवांकीत होताना पाहतो आहोत. आपल्याला लहानपणापासूनच बाळकडू दिले "ग्रंथ हेच गुरु" , "वाचाल तर वाचाल" आणि "ग्रंथ हेच खरे मित्र". अशा वेगवेगळ्या सुभाषितांनी आपल्या पूर्वजांचे जीवन चरित्र घडविले. त्यांनी ते सकसपणे दर्जेदार लिहिले. आणि जे लिहिले ते पुढच्या पिढीने वाचून नवनवीन संशोधन करून जागतिक विकास केला. अशा या विकासाच्या नोंदी कला ,साहित्य ,नाटक ,कविता ,कादंबरीच्या रूपाने वाचण्यासाठी लिहून पुस्तकरुपी ठेवा सुपूर्द केला.

आपल्या अगोदरच्या दोन पिढ्या नंतरच्या दोन पिढ्या यांच्या वाचन संस्कृतीत खूप फरक सातत्याने जाणवतो. आपल्या लहानपणी दगडी पाटीवर जे लिहिले जायचे ते शाळेत शिक्षकांना दाखवेपर्यंत ती पाटी न पुसता जपली जात होती. म्हणजे जपून वागणे आले .त्यात कापडी पिशवीतून पाटी न्यायची म्हणजे किती सांभाळून वावरावे लागायचं....यातूनच एक जगण्याचे शास्र आत्मसात होत होते.शाळेत गेल्यावर प्रथम भल्या मोठ्या फळ्यावर मान वर करून पंचांग, तिथी, सुविचार, दिवसाचे महत्व ,म्हणी, पाढे, एखादी गोष्ट सांगणे व एखाद्या पुस्तकाबद्दल शिक्षक माहिती देत असत. तालासुरात प्रार्थना म्हणणे नित्याचे होते त्यामुळे वाचन संस्कृती आपोआपच पुढच्या पिढीकडे हस्तांतरित होत होती. प्रत्येकाने आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेऊन साहित्य, संस्कृती व कला याचा प्रचार प्रसार करणे महत्त्वाचे आहे. पण आजकाल डिजिटल तंत्रज्ञानामुळे वाचनाची परिस्थिती खूप बदलली. मुले वाचत नाहीत असे नाही. वाचतात... पण ते काय वाचतात ? कसे वाचतात ? कुठे वाचतात ? हा मोठा संभ्रम आहे. आजकालची पिढी काळानुरूप इ- बुक्स, ऑडिओ बुक्स, ई- जर्नल्स ,युट्यूब, गुगल, विकिपीडिया अशा वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग आयपॅड मोबाईल वरून सर्रासपणे वाचनासाठी करतात .अशा वेगवेगळ्या माध्यमांवरून वाचतात, संग्रहित करतात पण एखाद्या वायरस आला तर मात्र या सगळ्या संकलनाची माहिती एका सेकंदात गायबही होते. पण पुस्तके मात्र छापील असतात ती पुस्तके मनातही छाप सोडतात विचारांची.. सामाजिक जाणीवेची... नीतिमत्तेची... भावनिक बांधिलकीची ...आणि निरंतर खूण ठेवतात.

आपल्याला लहानपणी शाळेच्या पहिल्या दिवशी काहींची जुनी पुस्तके टापटीप कव्हर घातलेली , काहींची नवी कोरी पुस्तके असायची. नव्या को-या पुस्तकांचा प्रत्येक जण पुस्तकांच्या पानांचा गंध घेत श्वासात भरून अभ्यास करायचे. हल्ली ई-बूकने तर पुस्तक गंधाला काळाआड नेले. घरातील मुले तेव्हा शाळेतून घरी आल्यावर मोठ्या आवाजात वाचन करीत त्यामुळे घरातील थोरा मोठ्यांचे मार्गदर्शन होत असे आत्ताच्या काळात मुलांचे मोठ्याने जाऊ देत पण... डोळ्यांनीच वाचणे होते. म्हणजे शब्द उच्चारणाचे तर तीन तेरा वाजलेले असतात. यासाठीच वाचन संस्कृती हा एक उत्सव चळवळ घरापासूनच राबवली पाहिजे. म्हणजे वाचन समृद्ध करेल नव्या पिढीचे जीवन.

काही तरूण पिढीतील मुले सर्वांच्या एकत्रित वाचनासाठी वेगवेगळे वाचन कट्टे ,वाचन वेडा समूह, हिरव्यागार गार्डनमध्ये पुस्तके वाचण्यास (मोबाईल शिवाय) सर्वांना प्रोत्साहित करत आहेत. लेखक,शिक्षक ,प्राध्यापक व नवलेखक नवनवीन कलाकृतीतून ,ग्रंथदिंडी,पुस्तक देवाणघेवाण,ग्रंथजत्रा ,मासिकातून , वृत्तपत्रातून मार्गदर्शन करत वाचनाचे महत्व अधोरेखित करत वाचन समृध्द करत आहेत.

माणसे सुसंस्कृत प्रगल्भ होतात वाचनाने. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्री कृतीतून प्रत्ययास आणण्याचे कार्य पुस्तकांच्या रूपाने होऊ शकते. आजच्या पिढीवर वाचन संस्कृतीचे संस्कार करण्यासाठी पुस्तकांशिवाय दुसरे प्रभावी माध्यम नाही.म्हणून वाचन संस्कृती काल जशी होती तशीच नव्यारूपात आजही वाचन संस्कृतीचा वेल बहरत आहे....नव्या रूपात.

**सौ. निर्मला श्रीनिवास देऊसकर**
**वेंगुर्ला.**

